पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक - ४२

सभावृत्तांत

दिनांक :- १९.०१.२०१०    वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१० ची मासीक मा.महापालिका सभा मंगळवार दिनांक १९.०१.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन    महापौर
२. मा.आसवानी डब्बु    उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.थोरात एकनाथ दादा
७. मा.दत्तात्रय बाबुराव साने
८. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
९. मा.लोखंडे सुजाता सुनिल
१०. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
११. मा.बो-हाडे शरद परशुराम
१२. मा.आल्हाट शांता महेंद्र
१३. मा.डॉ. सौ. मीना पाटील

१४. मा.कुंभार रामदास तानाजी

१५. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१६. मा.गवळी विजया पंडित

१७. मा.अजित दामोदर गव्हाणे

१८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१९. मा.महेश किसन लांडगे

२०. मा.फुगे सुनंदाताई विजय

२१. मा.आशा अंकुश लांडगे

२२. मा.मोहिनी विलास लांडे

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.सावळे सिमा

२५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२७. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.काळूराम मारुती पवार

३५. मा.आझम फकीरभाई पानसरे

३६. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३७. मा.भापकर मारुती साहेबराव

३८. मा.शेट्टी जगदिश

३९. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

४०. मा.बोबडे भिमा सखाराम

४१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४२. मा.गवळी शशीकिरण

४३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४४. मा.उबाळे वैशाली संजय

४५. मा.सुमनताई मधुकर पवळे

४६. मा.कुमार आर. एस.

४७. मा.उल्हास शेट्टी

४८. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४९. मा.कुटे गोपाळ नाना

५०. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५१. मा.भोंडवे तुकाराम महादू

५२. मा.खानोलकर मनोज विक्रम

५३. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५४. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५५. मा.वाघ रघुनाथ दलपत

५६. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५७. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५८. मा.आण्णा दादू बनसोडे

५९. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६०. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६१. मा.अपर्णा निलेश डोके

६२. मा.गावडे जयश्री वसंत

६३. मा.साबळे जगन्नाथ दगडू

६४. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६५. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६७. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६८. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६९. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

७०. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७१. मा.भारती ज्योती सुखलाल

७२. मा.कोकणे संतोष अंकुश

७३. मा.सुतार विजया विजय

७४. मा.दरेकर सतीश दगडू

७५. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७६. मा.बारणे संतोष नागु

७७. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७८. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

७९. मा.कलाटे कमल तानाजी

८०. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

८१. मा.खोमणे लता हनुमंत

८२. मा.प्रशांत शितोळे

८३. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८४. मा.अशोकभाई सोनवणे

८५. मा.साळुंखे सुरेखा मारुती

८६. मा.जगताप शंकर पांडुरंग

८७. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८८. मा.एकनाथ मोटे

८९. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

९०. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

९१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९२. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९४. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

९५. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९६. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९७. मा. विनायक सुरेश रणसुभे

९८. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.सावंत, मा.मुंढे, मा.झुरे, मा.गावडे, मा.गायकवाड, मा.भोसेकर -सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटिल-उपसंचालक (नगररचना), मा.चव्हाण- अति.शहर अभियंता, मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.सवणे,मा.जाधव -कार्य.अभियंता, मा.भारती-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.साळुंखे-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी व मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

कृष्णाई संगीत विद्यालय, श्री क्षेत्र आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे या संस्थेस अनुदान र.रु. १,००,०००/- अदा करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव

सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा. आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ७५ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(मुंबईत झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यात शहिद झालेल्या पोलीस कर्मचा-यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी पुणे येथुन मुंबईला स्केटींग करीत गेलेला सांगवी येथील चि.ओंकार राकेश ढोरे (वय ७ वर्षे) यांचा व त्यांचे प्रशिक्षक श्री.अजय जगताप यांचा तसेच स्कॉलरशीप परिक्षेत राज्यात दुसरी आलेली राणूबाई नागूभाऊ बारणे प्राथमिक शाळा, थेरगाव मधील विद्यार्थीनी कु.श्रध्दा मलकापुरे यांचा तसेच प्राथ. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्यल आदर्श शिक्षक म्हणुन राष्ट्रीय पुरस्काराने मा. राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित केलेले विद्यानिकेतन मनपा शाळा, पिंपरी वाघेरे येथील मुख्याध्यापक श्री.सुभाष काशिनाथ दहिफळे यांचा तसेच हॉकी स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याबद्यल कु.लक्ष्मी माने या विद्यार्थीनीचा व त्यांचे प्रशिक्षक श्री. कदम सर यांचा सत्कार करण्यात आला.)

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री व ज्येष्ठ सीपीएम नेते थोर राष्ट्रीय व्यक्तिमत्व- कॉम्रेड- ज्योती बसू, जागतिक ख्यातीचे वकील-बॅरिस्टर भास्करराव घोरपडे, माहिती अधिकार क्षेत्रांतील जाणकार कार्यकर्ते सतीश शेट्टी, भोसरी येथील नवमहाराष्ट्र तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार विलास लांडे यांचे चुलते-ज्ञानेश्वर लांडे,माजी खासदार-अरविंद कांबळे, महापालिकेचे माजी नगरसदस्य- सत्तारुढ पक्षनेते- जमाल सिद्दीकी, पुणे महापालिकेच्या पहिल्या महिला उपमहापौर-नजमा खान, पुणे महापालिकेचे माजी नगरसदस्य-अनंता भोज, ज्येष्ठ उद्योगपती समाजसेवक- शांतिलाल सोमय्या, पवना सहकारी बँकेचे संचालक-रवींद्र उर्फ चंद्रकांत बाबूराव नाणेकर, चिखली येथील ज्येष्ठ नागरिक- गेनभाऊ विठोबा यादव, डॉ.निलेश रामचंद्र पिल्ले, वाहतुक नियंत्रक PMPML-विलास दामुआण्णा कुदळे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, अनुमोदन आहे.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

अ)  मा.महापालिका सभा क्र.३७ दि.१८/९/०९, ३/११/०९, १९/१२/०९ व २१/१२/२००९ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब)  मा.महापालिका सभा क्र.४१ दि.१९/१२/०९ व २१/१२/२००९  [दु.२:०० व २:२५] चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.महपौर  :- प्रश्नोत्तरे- मा.बाबु नायर,मा.संतोष बारणे,मा.भाऊसाहेब भोईर यांना विचारावयाचे प्रश्न.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पोटनिवडणूकीत निवडून आलेले शिवसेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक श्रीरंग बारणे यांचे अभिनंदन करणेत यावे.

मा.सतीष दरेकर :- अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सन्मा.ज्येष्ठ नगरसेवक श्रीरंग बारणे यांची नगरसेवक पदावर निवड झाल्याबद्यल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सर्व सन्मा.सदस्यांना सांगतो की, प्रश्नोत्तरासाठी जास्तीत जास्त अर्धा तास आहे आणि तशी नियमामध्ये तरतूद आहे. प्रश्नांची उत्तरे देणेत आलेली आहेत ज्याठिकाणी सदस्यांचे समाधान होत नाही त्याठिकाणी प्रश्न विचारु शकतात.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, महत्वाच्या प्रश्ना संदर्भात लक्षवेधी सूचना अनेकवेळा घेतली जात होती. विषयाचे गांभीर्य लक्षात घेता प्रश्न येतात त्यावेळेला वेळेचे बंधन नसावे, आपण सभागृह शहरासाठी चालवित असतो. याठिकाणी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात वारंवार चर्चा करुनही प्रशासनावर काहीही फरक पडलेला नाही. चिंचवड चापेकर चौकाबद्यल  प्रश्न दिलेले आहेत त्याठिकाणी अंदोलन सुध्दा करु शकलो असतो परंतू वस्तुस्थिती काय आहे हे शहराला माहिती व्हावे त्यादृष्टीने प्रश्न विचारलेले आहेत. प्रशासनाला JNNURM ची रक्कम जेव्हापासून येऊ लागलेली आहे तेव्हापासून छोटया-मोठया कामाकडे लक्ष राहिलेले नाही. नगरसेवक काहीही बोललेतरी सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर,सभा संपली की ते विसरुन जातात असे अधिका-यांना वाटते. याठिकाणी चापेकर चौकासंदर्भात महत्वपुर्ण असा विषय आहे. चिंचवड चापेकर चौक येथे उड्डाणपुलाचे काम कधी सुरु झाले असा प्रश्न उपस्थित केला होता. यामध्ये उत्तर असे दिलेले आहे की, चिंचवड चापेकर चौक येथे उड्डाणपुलाच्या कामाचे आदेश दि. २२.१०.२००७ रोजी देण्यात आले आहेत. सदरच्या कामात चापेकर चौकात इलेव्हेटेड रोटरी बांधणे असा अंतर्भाव होता परंतु सदर चौकात असलेल्या मुस्लिम दफनभूमीच्या जागेचा ताबा न मिळाल्यामुळे काम करता आले नाही. कोणत्याही कामाचे नियोजन करत असताना त्या जागेचा ताबा आल्यानंतर नियोजन का करत नाहीत यामुळे आपल्याला अडीच ते तीन कोटीचा भूर्दंड भरावा लागतो.  नगरसेवकांच्या वॉर्डातील काम करत असताना

रक्कम नाही, तरतूद नाही अशी कारणे दिली जातात. याठिकाणी वाढीव खर्च ३०० ते ४०० कोटी द्यावा लागला आहे. तुम्ही जागा ताब्यात नसताना टेंडर कसे काय काढता. या कामासाठी दिलेला कार्यकाल किती आहे असे विचारले होते. त्याचे उत्तर दिलेले आहे मूळ कामासाठी १५ महिने मुदत देण्यात आली होती परंतू चापेकर चौकात रोटरीऐवजी उड्डाणपुल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार ठेकेदारास दि. २१.५.२००९ पासून १८ महिन्याची मुदत देण्यात आली आहे. म्हणजेच तीन महिने वाढवून देण्यात आले आहेत. महापालिकेला ठेकेदारानी काहीही काम न करता अडीच कोटीचा भूर्दंड द्यावा लागला आहे. आता तुम्ही आदेश देवून सुध्दा आठ महिने झालेले आहेत मग त्यांच्याकडून तुम्ही भूर्दंड घेतला आहे का. नवीन नवीन प्रोजेक्ट येतील त्यावेळेला आगाऊ रक्कमेचे बील देण्यामध्येच सर्व जाईल. आयुक्त साहेबांनी वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट दिलेले आहे १२५ कोटीची बीले राहिली आहेत आणि त्याच्या अगोदरची बीले कोणी द्यायची. मिडिया समोर चुकिचे सांगणे म्हणजेच आमची पत कमी करणे आणि आपली पत वाढविणे हा उद्देश आहे. मोठमोठे प्रोजेक्ट कशा पध्दतीने झाले आहेत त्यावर एक मिटिंग ठेवावी जेणेकरुन आगाऊ रक्कम देणे बंद होईल. याठिकाणी काही ठेकेदार महापालिकेनी दत्तक घेतलेले आहेत. आजची परिस्थिती अशी आहे की टेंडर मंजूर आहे पण तरतूद नाही. आयुक्त साहेबांनी चापेकर चौकाबद्यल खुलासा करावा. मागच्यावेळेस सांगीतले होते की आठ दिवसात काम चालू होईल. ठेकेदाराला पैसे द्यायला नसतील व कालावधीमध्ये काम पुर्ण झाले नाहीतर तो आपल्यावर दोष ठेवून आपल्याकडून पैसे घेईल. तरी याचे गांभीर्य लक्षात घ्यावे. चापेकर चौकामध्ये संपूर्ण गावातील लोक ये-जा करत असतात. लोकांना आपले जीव मुठीत ठेवून तेथून ये-जा करावी लागते. महापौरांना विनंती करतो की पुढच्या बजेट मध्येतरी मोठे प्राजेक्ट थांबवावेत. मुदतीत काम न झ ाल्यास काय कार्यवाही करणार आणि जागेचा ताबा नसेलतर त्यास आगाऊ रक्कम किती देणार हे सांगावे.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, आताच आमचे ज्येष्ठ सहकारी भाऊसाहेब भोईर यांनी चापेकर चौकाबद्यल सांगीतले आहे त्याची प्रशासनाने दखल घ्यावी. २२.१०.२००७ ला चापेकर चौकातील काम चालू झाले आहे. आजपर्यंत शहरातील सर्व नागरीकांना त्याचा मानसीक त्रास होतो आहे. १८ महिन्याच्या मुदतीत तीन खांब उभे केलेले आहेत. महापालिकेकडून ठेकेदाराला किती रक्कम दिली याचा खुलासा करावा.तसेच अगाऊ किती रक्कम दिली हे सांगावे. मुळ रोटरी ऐवजी उड्डाणपुल असे लिहिले आहे त्यामध्ये काम जास्त वाढले का कमी झाले याचा खुलासा करावा. यामध्ये महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याठिकाणाहून एमआयडीसीच्या पाणीपुरवठयाच्या नलीका गेलेल्या आहेत त्याचा सल्लागाराने उल्लेख न केल्यामुळे हे झाले आहे याचे उत्तर दयावे.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, चिंचवड येथील पुलाचे काम रखडलेले आहे त्यामुळे नागरीकांना मनस्ताप होतो आहे. शहरातील अनेक कामाचे नियोजन करताना मग त्यामध्ये स्थापत्य विभाग असेल किंवा इतर

त्यांनी व्यवस्थीत नियोजन न केल्यामुळे, जागा ताब्यात नसताना टेंडर काढले जाते. भोसरी उड्डाणपुलाचे उदाहरण आहे, घरकूल योजनेचे उदाहरण आहे. जागा ताब्यात नसल्यामुळे हे झालेले आहे. बंद पाईपलाईन योजनेचे सुध्दा असेच झालेले आहे. सांगवीच्या रिटेनींग वॉलचे काम राहिलेले आहे. निम्मे झालेले आहे. अधिकारी लोक टेंडर काढतात, मोठमोठया अमौंट मंजूर करुन घेतात व त्यामुळे महापालिकेला भूर्दंड सोसावा लागतो. चिंचवडमध्ये नागरीकांना त्रास होतो तो आपणही अनुभवलेला आहे. हे काम चौकामध्ये असल्यामुळे हा प्रश्न पुढे आलेला आहे अशी अनेक कामे आहेत. येथून पुढे पहिल्यांदा जागा ताब्यात घेवून नंतरच नियोजन करावे.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, भाऊसाहेबांनी एक महिन्यापुर्वी माहिती मागीतली होती आणि त्याचे उत्तर आता सभा चालू होण्यापुर्वी आम्हांला मिळालेले आहे. चापेकर चौकातील पुलाचे काम तीन वर्षापासून चालू झालेले आहे. काळेवाडीच्या पुलाला जागा मी दिलेली आहे. अधिका-यांची मनस्थिती बिघडलेली आहे. अधिका-यांनी ठेकेदाराला दत्तक घेतले आहे असे भाऊसाहेब म्हणाले पण मी तर असे म्हणेन की ठेकेदारानी अधिका-यांना दत्तक घेतले आहे. माझ्या वॉर्डातील भींतीच्या कामाचेही असेच झालेले आहे. अशा अधिका-यांची बदली करुन त्याठिकाणी मनापासून काम करणारे अधिकारी ठेवावेत. चापेकर पुल,काळेवाडीचा पुल का होत नाही. या अधिका-यांना पाणीपुरवठा विभागाकडे पाठवावे. माझ्या वॉर्डातील कामाबाबत ऊगिले साहेबांना दहा वेळेस फोन केलेला होता ते म्हणाले भोसेकर साहेंबांना फोन करा, भोसेकर साहेब म्हणाले इंगळे साहेबांना फोन करा. भोसेकर साहेबांची बदली करावी व ऊगिले साहेबांना शासनाकडे पाठवावे. ज्येष्ठ नगरसेवकांनी माहिती विचारलेली आहे व ती माहिती सभा चालू होण्या अगोदर दिली आहे स्थापत्य विभाग, पुलप्रकल्प विभागास सुधारण्यासाठी पंधरा दिवसाची संधी दयावी अन्यथा कोर्टात खेचू. काळेवाडीचा पुल अर्धवट झालेला आहे. आमच्या वॉर्डातील डांबरीकरण करायचे म्हणलेतरी बजेट नाही म्हणून सांगतात. एखादे अतिक्रमण पाडा म्हणलेतर पोलीस नाहीत म्हणतात. काळेवाडी पुल ते पेट्रोलपंप याठिकाणचे तीन कोटीचे काम आहे त्याचे काय झाले हे सांगावे इंगळे,साळवी या अधिका-यांची पाणीपुरवठयाकडे बदली करावी.

मा.महापौर :- चापेकर चौकाबद्यल प्रश्न विचारलेले आहेत याच प्रश्नावर बोलावे.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, खुलासा करायला सांगावा. एक महिन्यापुर्वी प्रश्न दिले आहेत त्याची माहिती आता मिळालेली आहे.

मा.राजेंद्र साळूंके :- मा.महापौर साहेब, गेल्या दोन-तीन वर्षापासून चापेकर चौकातील पुलाविषयी अनेक वादविवाद, तक्रारी करुन, भाऊसाहेब भोईर नगरसदस्य यांनी सूचना मांडूनही तेथील पुलाचे काम का पुर्ण होत नाही. मोरया हॉस्पिटल समोर व्यापारी संकूल आहे ते काम सुध्दा अर्धवट पडलेले आहे. त्याठिकाणी ट्रक उभ्या असतात. या सर्व गोष्टीचा निर्णय व्हावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आपल्या महापालिकेमध्ये एखादा प्रोजेक्टतरी वेळेवर झाला आहे का हे सांगावे. वाढीव कामामुळे महापालिकेचे वाटोळे झालेले आहे. हे काम २२.१०.२००७ ला देण्यात आलेले आहे. आपल्याकडे Accountability काही आहे का नाही, करोडो रुपये आपण वाढवून देतो याला जबाबदार कोण आहे. या ब्रीजला कोणामुळे डिले झालेला आहे. पहिल्यांदा कन्सलटन्सी काढून टाका. हे लोक वाढीव घेण्यामध्ये इन्ट्रेस्टेड असतात. त्यांना लाखो करोडो रुपये आपण मोजतो. ते पहिल्यांदा ॲडव्हान्स घेतात. मागे डोकेताईनी सांगीतले होते २००६-२००९ पर्यंतच्या झालेल्या कामाची इन्क्वॉयरी करुन कार्यवाही करा, त्यावर काय कार्यवाही केलेली आहे. आयुक्तांनी सांगीतले राजदेरकर यांच्याकडे हे काम दिलेले आहे त्याचे काय झाले. याला कोण जबाबदार आहे. काय कार्यवाही करणार आहेत. प्रत्येक प्रोजेक्टला कन्सलटन्सी असून सुध्दा टाईम लिमिट वाढवून दिलेले आहे, दहा-दहा कोटी वाढवून दिलेले आहेत. वाढीवला काही मर्यादा आहे का नाही. मर्यादा असेलतर याठिकाणी कसे वाढवून दिलेले आहे. या प्रोजेक्टच्या कामास डिले झालेला आहे त्यास कोण जबाबदार आहे त्यांच्यावर काय कार्यवाही करणार आहेत. ही परिस्थिती कधीतरी सुधारणार आहे का नाही. महापालिकेच्या फंडचे नुकसान होत आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, भाऊसाहेब भोईर यांनी चिंचवड चापेकर चौका बद्यलचे प्रश्न विचारलेले आहेत. त्याचे उत्तर दिलेले आहे. दफनभूमीच्या जागेचा ताबा न मिळाल्यामुळे काम करता आले नाही असे सांगीतले आहे. माझ्या माहितीप्रमाणे संबंधित अधिकारी, या ट्रस्टचे लोक आणि मी स्वत: एकत्र बैठक घेतलेली आहे व यावर तोडगा सुध्दा काढलेला आहे. दिडवर्षापुर्वी या जागेसंदर्भात जीबीला उपसूचना देवून विषय सुध्दा पास केलेला आहे. त्याठिकाणची जागा आगा यांची आहे. त्या जागेवर महापालिकेचे रिझर्व्हेशन आहे. त्याठिकाणी २० गुंठे जागा आहे ती देण्याची ट्रस्टने लेखी मान्यता दिलेली आहे. जीबीमध्ये तसा ठराव सूध्दा पास झालेला असताना आपल्याला ताबा का मिळालेला नाही. आजपर्यंत हा विषय का झालेला नाही. कुठलेही काम करत असताना आपण म्हणत असतो महापालिकेची परिस्थिती बिकट आहे. या कामामध्ये निष्काळजीपणामुळे आपल्याला भूर्दंड पडलेला आहे. जीबीमध्ये फक्त तोंडसूख घ्यायचे का. संबंधित अधिका-यांवर कधीतरी कार्यवाही होणार का नाही, त्यांच्यावर विनाकारण कार्यवाही करु नये पण जबाबदार असेलतर शिक्षा झाली

पाहिजे. योग्य ती चौकशी झाली पाहिजे. यामध्ये प्रशासन कुठे चुकले याबाबत चौकशी व्हायला पाहिजे. एक-दोन कोटीचा फटका बसला असेलतर याला जबाबदार कोण. महापालिकेचे नुकसान झाले असेलतर त्याला जो कोणी जबाबदार असेलतर त्यांच्यावर कडक कार्यवाही व्हायला पाहिजे व त्याची सुरवात आजपासून करावी. अधिका-यांनी सुध्दा आपले काम करताना पुर्वीची पध्दत बदलली पाहिजे. पुर्वी आपली परिस्थिती चांगली होती त्यामुळे कुठल्याही गोष्टीकडे सहजपणे लक्ष जात नव्हते. आता कुठलेही काम नडलेतर नगरसेवक,पत्रकार,नागरीक लक्ष देत असतात. चापेकर चौकाबद्यल ब-याच दिवसापासून अडचणी आहेत याची दखल घ्यावी.

मा.संतोष बारणे :- मा.महापौर साहेब, भाऊसाहेब भोईर यांनी चापेकर चौकाबाबत प्रश्न विचारला आहे त्याला उत्तर दिलेले आहे की, चिंचवड चापेकर चौक येथे उड्डाणपुलाच्या कामाचे आदेश दि. २२.१०.२००७ रोजी देण्यात आले आहेत. सदरच्या कामात चापेकर चौकात इलेव्हेटेड रोटरी बांधणे असा अंतर्भाव होता परंतू सदर चौकात असलेल्या मुस्लिम दफनभूमीच्या जागेचा ताबा न मिळाल्यामुळे काम करता आले नाही. जागा ताब्यात नसेलर टेंडर कसे काय काढले. औंध-रावेतचा रस्ता आहे मिलिटरीचे पैसे न दिल्यामुळे त्या भागातील काम बंद आहे. सर्वसामान्य नागरीकांची घरे प्रशासनाने नोटिस देवून काढलेली आहेत. मिलिटरीचे लोक आलेतर प्रशासनाला माघार घ्यावी लागते. बंद पाईपलाईनच्या संदर्भात सांगायचे झालेतर जागा ताब्यात नसताना टेंडर काढलेले आहे. ४९ कोटीची रक्कम ठेकेदाराला आगाऊ दिली आहे,पाईपलाईन खरेदी केली आहे ती धुळखात पडलेली आहे. अशा पध्दतीचे नियोजन असेलतर महापालिका बुडीत निघणार आहे. जे कर्ज घेणार आहोत त्याचे हप्ते महापालिकेच्या फंडातून न देता ज्यांनी चुकिच्या पध्दतीने काम केलेले आहे त्यांच्याकडून हप्ते घेण्यात यावेत.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, आझमभाई पानसरे यांचे आभार मानतो. त्यांनी सुध्दा या गोष्टीचे गांभीर्य घेतलेले आहे प्रशासनाने उत्तर दिले म्हणजे त्यांची जबाबदारी संपली असे उत्तर दिलेले आहे १८ महिन्याच्या कालावधीमधील ८ महिने गेलेले आहेत, राहिलेल्या १० महिन्यामध्ये काम होणार आहे का नाही व होणार असेलतर त्याला तरतूद उपलब्ध आहे का तरतूद नसताना काम केलेतर महापालिकेला भूर्दंड दयावा लागेल. सभागृह हे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आहे. चापेकर चौकाचा खुलासा करावा. चर्चेची पंधरा मिनिटे कमी केलीतर पाच ते सहा कोटीचा फटका बसणार आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब,आम्ही स्थायी समितीत होतो त्यावेळेला हा विषय झाला होता. अजीत गव्हाणे चेअरमन होते. आयुक्तांनी हा विषय त्यांच्या अधिकारात केलेला आहे. त्यावेळेस हा विषय केला नसता फेटाळला असतातर हा प्रश्न आला नसता व जे नुकसान झाले आहे ते वाचले असते. प्रशासनाच्या

निष्काळजीपणाने हे झालेले आहे त्यामुळे महापालिकेला भूर्दंड पडलेला आहे. आझमभाई पानसरे बोलल्याप्रमाणे संबंधित अधिकारी जे आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, याचे उत्तर सिटि इंजिनिअर यांनी द्यायला पाहिजे. सभागृहात प्रश्न असतीलतर सिटि इंजिनिअर आऊट ऑफ स्टेशन कसे काय जातात.

मा.अति.आयुक्त :- मा.महापौर साहेब, सिटि इंजिनिअर अर्जेन्टली अहमदाबादला गेलेले आहेत. ते मा.महापौरांची परवानगी घेवून गेलेले आहेत. ठुबे नुकतेच रिटायर्ड झालेले आहेत ७० लाख आगावु रक्कम दिलेली आहे या वर्षी माझ्या माहितीप्रमाणे अडीच कोटीची तरतूद होती. पुढील वर्षी दहा कोटीच्या आसपास तरतूद होईल. हे काम पुर्ण होऊ शकेल असे कार्यालयाच्या वतीने सांगीतलेले आहे. या कामास डिले झालेला आहे. त्याबाबतीत चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, तरतूद नाही असे सांगीतलेले आहे. तूमच्याकडून तो वाढीव खर्च मागणार आहे. त्याला एक वर्षे थांबविले त्यामुळे त्यानी दंडासहीत रक्कम वसूल केलेली आहे. आता आठ महिने झाले कोणतेही काम केलेले नाही त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार आहात.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, मुळ प्रस्ताव इलेव्हेटेड रोटरीचा होता त्याऐवजी उड्डाण पुल बांधण्याचा प्रस्ताव झाला. दि.२१.५.२००९ पासून १८ महिन्यात काम करण्यासाठी सांगीतलेले आहे. आठ महिने गेलेले आहेत त्यानी काम केलेले नाही कारण कामात एमआयडीसी पाईपलाइन, केबल्स त्यानंतर पावसाळा अशा अडचणी होत्या.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, सर्व अडचणी एक दिवसात आल्या का. दफनभूमी काल झाली का. एमआयडीसीच्या पाईपलाईनचा प्रश्न कालचा आहे का. महापालिकेचे कोटयावधी रुपये चाललेले आहेत.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, रोटरीसाठी दफनभूमीची अडचण झालेली आहे पहिला रोटरीपुल होता त्यानंतर उड्डाणपुलाचा निर्णय झाला. २१.५.०९ नंतर विलंब झालेला आहे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, महापालिकेनी १८ महिन्याचा कालावधी दिलेला आहे त्यात ८ महिने गेलेले आहेत. त्यांनी महापालिकेकडून अडीच कोटीचा भूर्दंड घेतला आहे. परत एमआयडीसीचा मुद्या आला आहे, आता म्हणतात तरतूद नाही त्यामुळे ठेकेदार म्हणतो मी कशाला काम करु.

मा.महापौर :- १८ महिन्यातून आठ महिने गेले ते आपल्या कारणास्तव गेलेले आहेत. हे काम किती दिवसामध्ये होणे अपेक्षीत आहे.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, उर्वरीत कालावधीमध्ये काम करावे असे संागीतलेले आहे. उर्वरीत मुदतीत काम पुर्ण केले नाहीतर ठेकेदाराला दंड करण्यात येईल.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, हे अधिकारी काल परवा आलेले आहेत. दफनभूमीचा मुद्या उपस्थित केला त्याच्यानंतर ताबा मिळालेला आहे. त्यांचे काम शांतपणे चालू आहे. त्यानंतर एमआयडीसीचा मुद्या उपस्थित केलेला आहे. परत आपली चुक आहे. मागच्या चुकीसाठी अडीच कोटी दिले आहेत या चुकिचे किती पैसे देणार आहात.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, थोडेसे निर्णय चेंज करावे लागतील.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहब, या सर्व पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा पाच ते सात कोटीला फटका बसणार आहे. तुम्ही ठेकेदारावर कार्यवाही करणार आहात. का ठेकेदार तुमच्यावर करणार आहे हे समजत नाही. आठ महिने गेलेले आहेत त्यात सुध्दा काम झालेले नाही. ऑलरेडी आपण ठेकेदाराला घरी बसून अडीच कोटी दिलेले आहेत.

मा.महापौर :- तरतूद शिल्लक आहे का नाही.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, या वर्षासाठी तरतूद आहे पुढच्या वर्षासाठी आम्ही सुचवू.

मा.महापौर :- १८ महिने वाढ दिलेली होती त्यामधील ८ महिने गेलेले आहेत १० महिन्यात हे काम कसे होईल. त्यांना साईट उपलब्ध करुन दिलेली नाही.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, बाकीची साईट त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, ते सूध्दा काम त्यांनी केलेले नाही.

मा.निकम :- मा.महापौर साहेब, फाऊंडेशनचे काम चालू केलेले आहे.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, निकम साहेब दोन-तीन महिने झाले त्याठिकाणी आलेले आहेत. ठूबे साहेबांनंतर त्यांनी चार्ज घेतलेला आहे. याठिकाणी जागा ताब्यात नव्हती ही प्रशासनाची चुक झालेली आहे. मुळ जे टेंडर काढले होते ते वेगळे होते व नंतर वेगळया पध्दतीने काम करायचे ठरविले त्यामुळे कामाला डिले झालेला आहे. आगा नावाचे गृहस्थ जागा देण्यास तयार

झाले नंतर त्यांनी नाही म्हणून संागीतले. त्यामुळे काम वाढले आहे. ठेकेदाराचे असे म्हणणे आहे की काम केल्यानंतर ताबडतोब पेमेंट द्यायला पाहिजे त्यामुळे ते काम करत नाहीत. त्याठिकाणी ट्रॅफिक जामचा त्रास काम करत असताना होत आहे. तसेच त्याचे पेमेंट ताबडतोब द्यायला पाहिजे. निकम साहेब आपण खरी

माहिती सभागृहाला द्यावी. जी वस्तुस्थिती आहे ती सभागृहासमोर मांडावी त्यामुळे मार्ग निघु शकेल.

मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, खरेतर चापेकर चौकातील पुलाचा प्रश्न जिव्हाळयाचा आहे. पुलाचे डिझाईन बदलण्याचे ठरले, प्रशासनाकडून निर्णय घेण्याबाबत दिरंगाई झालेली आहे. जास्तीत जास्त प्रमाणात ठेकेदाराची पेमेंटविषयीची समस्या होती चापेकर बंधूचा पुतळा आहे त्याचे काय नियोजन आहे. त्याचे नियोजन नसेलतर पुन्हा ते काम रखडणार आहे. पुतळा आहे, पाईपलाईन आहे. त्याठिकाणी असंख्य ॲक्सीडेंट होतात. याबाबतीत प्रशासन काय करणार आहे. पुतळयाचा निर्णयही आताच होणे आवश्यक आहे. त्याबद्यल प्रशासनाला सुचना दयावी.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, वाकड ते हिंजवडी एक्सप्रेस हायवेचा पुल झालेला आहे त्या ठिकाणाहून जात असताना प्रत्येकजण त्या पुलासंदर्भात उल्लेख करत असतो. तो किती चुकिचा बांधलेला आहे ते उदाहरण आहे. तो एक्सप्रेस हायवेला क्रॉस टाकलेला आहे. या पुलाच्या संदर्भात काळजी घेतली पाहिजे. लोकांनी भविष्यामध्ये आपल्याला शिव्या देवू नयेत. तरी यासंदर्भात संबंधीत अधिका-यांनी चर्चा करुन करावे. नवीन जे काही करणार आहेत त्यात लक्ष घालावे. त्याठिकाणी जास्त वर्दळ थेरगांवकडे जाणा-या लोकांची असते, तरी ही सर्व काळजी घ्यावी.

मा.महापौर :- सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रशासनाला असे सूचित करण्यात येत आहे की त्यांनी बेजबाबदारपणा, गलथान कारभार थांबवावा. चापेकर चौकातील पुलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करावे त्यासाठी चार दिवसामध्ये नगरसेवक, संबंधित अधिकारी,आयुक्त व सिटि इंजिनिअर यांची बैठक घेण्यात येईल. जागा आपल्या ताब्यात नसेल किंवा टाईम लिमिट असेलतर त्याची जबाबदारी ठेकेदारावर व अधिका-यावर असणार आहे. कोणत्याही प्रकारची वाढ दिली जाणार नाही. जागा ताब्यात आहे किंवा नाही हे पाहिल्याशिवाय कोणतीही निवीदा काढू नये तसे केलेतर संबंधित अधिका-यांना निलंबीत सुध्दा करण्यात येईल. हा अत्यंत महत्वाचा पुल आहे हे काम सुरळीत करावे पुढचा प्रश्न घ्यावा. मा.मारुती भापकर यांना विचारावयाचे प्रश्न.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, महापालिका ठ.क्र.५८२ दि. १३.२.२००९ अन्वये मंजूरी दिलेली आहे, आम्ही त्याला विरोध केलेला होता. विषय मंजूर

झाल्यानंतर वर्तमानपत्रामध्ये महापालिकेची मिळकत तारण ठेवून कर्ज घेणार अशाप्रकारची बातमी आल्यानंतर त्यावर आयुक्त साहेबांचे स्टेटमेंट वाचण्यात आले त्यामध्ये स्पष्टीकरण दिले आहे की महापालिकेच्या वतीने कुठल्याही प्रकारे, कुठलीही मिळकत तारण न ठेवता कर्ज घेणार आहोत. JNNURM अंतर्गत

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व आर्थिक दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्प या प्रकल्पासाठी र.रु. २०० कोटी व बीआरटीएस साठी र.रु. २१० कोटी असे र.रु. ४१० कोटी कर्ज घेण्याचा विषय आहे. प्रशासनाच्या वतीने ही माहिती देण्यात आलेली आहे. मी प्रश्न विचारलेले आहेत त्यात तारणा संदर्भात उत्तर देण्याचे टाळलेले आहे. आतापर्यंत महापालिकेच्या वतीने केंद्रशासनाकडे कशा पध्दतीने कर्ज घेण्यासाठी पत्रव्यवहार केला व करारनाम्याच्या अटि व शर्ती काय असतील. महापालिकेच्या वतीने कर्ज घेताना केंद्रशासनाच्या धोरणानुसार जागतीक बँकेबरोबर करारनामा होणार आहे यासंदर्भात प्रश्न विचारलेले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची आम्ही माहिती घेतल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ही सोने,इंधन यावर चालते. हुडकोकडून कर्ज घेणार आहोत अशी माहिती दिलेली आहे. केंद्रशासनाकडून, जागतीक बँकेकडून डॉलररुपात कर्ज घेणार आहोत. आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉलरचा दर वाढलातर महापालिकेवर भूर्दंड पडणार आहे. व्याजदरामध्ये वाढ होणार का नाही याचे स्पष्टीकरण करण्यात आले नाही. संपुर्ण कर्ज ४१० कोटीचे घेणार आहोत. हुडको व जागतीक बँकेकडून अशाप्रकारचे कर्ज घेतल्यानंतर त्याची परतफेड कशापध्दतीने करणार आहोत. एकिकडे जकातीचे उत्पन्न कमी होत आहे तसेच आपल्या भागातील उदयोग स्थलांतरीत होत आहेत, उत्पन्नाचे स्तोत्र कमी होत चालले आहे आणि दुसरीकडे मोठयाप्रमाणात कर्ज घेतो आहोत. ते कशा पध्दतीने फेडणार आहोत. आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉलरच्या किमंतीमध्ये फरक होतो त्यासंदर्भात प्रश्न विचारलेले होते. पिंपरी चिंचवड शहरातील करदात्या नागरिकांवर कर्जाचा बोजा वाढणार आहे किंवा कसे. असल्यास कोण कोणते कर वाढविण्याचे मनपाचे धोरण आहे याची सविस्तर माहिती मिळावी. महापालिकेच्या महसुली उत्पन्नातून सदर कर्जाची परतफेड करावी लागणार आहे असे उत्तर दिलेले आहे. महसूली उत्पन्न म्हणजे नक्की कुठले उत्पन्न आहे कराच्या संदर्भात राजदेरकर साहेबांच्या नेतृत्वाखाली कमिटि नेमलेली होती. भविष्यकाळात कर वाढविणार आहात का. ४१० कोटी कर्ज घेतल्यानंतर आणखी किती कर्ज घेणार आहोत. कुठलेही नियोजन नाही, प्रचंड वाढीव खर्च, अशाप्रकारची परिस्थिती असताना अशाप्रकारचे कर्ज घेतो आहोत. केंद्रशासनाकडून,राज्यशासनाकडून निधी येतो त्यात केंद्रशासनाकडून १५१.५० कोटी यायला हवेत आणि राज्यशासनाकडून ७६.४९ कोटी यायला पाहिजेत, ही रक्कम यायला विलंब होतो आहे त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीवर बोजा पडतो आहे. १०२ कोटीची ठेकेदाराची बीले देणे प्रलंबीत आहे. ठेकेदाराचे वेळेवर बील मिळत नाही म्हणून ते काम करत नाहीत आणि वेळ वाढला की त्यांचे दर वाढतात वाढीव खर्च द्यावा लागतो. राज्यशासनाचा निधी येत नाही त्यासंदर्भात आपल्या जिल्हयाचे पालकमंत्री मा.अजीतदादा पवार यांचे राज्यशासनामध्ये वजनदार मंत्री म्हणून नाव आहे. आपण सगळे त्यांच्याकडे जाऊ व राज्याकडील जो निधी येणार आहे तो लवकरात लवकर महापालिकेला कसा मिळेल अशाप्रकारचा आपण सगळयांनी

मिळून प्रयत्न केलातर चांगले होईल. त्यांच्या शब्दाला मा.मुख्यमंत्री यांच्याकडे वजन आहे. आपण जकातीच्या वसूलीत पारदर्शकता आणली, सिटि सेंटरचा व्यवहार पारदर्शक केलातर हे कर्ज घेण्याची आवश्यकता भासणार नाही. आपण महापालिकेची इमारत तारण ठेवणार असू आणि भविष्यकाळात आर्थिक परिस्थिती याही पेक्षा बिघडलीतर व या महापालिकेचा लिलाव केलातर पदाधिकारी, नगरसेवक म्हणून आपल्या सर्वांची नामुष्की झाल्याशिवाय राहणार नाही. ३५० कोटी पेक्षा अधिक रक्कमेची वाढीव खर्चाची उधळपट्टी केलेली आहे. सल्ला

देणा-या लोकांवर ७० कोटी खर्च केलेले आहेत, ३० ते ४० टक्के अबोव्ह निवीदा मंजूर केलेल्या आहेत. प्रचंड उपसूचना देवून अशाप्रकारची परिस्थिती आपण आणलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये ४१० कोटीचे कर्ज घ्यायला निघालेलो आहोत, महापालिकेची इमारत तारण ठेवायला निघालो आहोत. महापालिकेची नामुष्की होणार आहे. सर्व सन्मा.सदस्यांनी याच्यावर गांभीर्याने विचार करावा आम्ही पुर्वी या कर्जाला विरोध केला होता आणि आज सुध्दा विरोध आहे.

मा.महापौर :- मारुती भापकर तुम्ही जे प्रश्न विचारलेले आहेत त्याचे उत्तर दिलेले आहे. जागतीक बँक व हुडकोच्या कर्जाला या महापालिकेच्या सभासदानी मान्यता दिलेली आहे. तारण ठेवण्याकरिता सभागृहाने मान्यता दिलेली नाही. तो विषय सभागृहाने मान्यता दिल्याशिवाय होणार नाही. महापालिकेनी कर्ज अजून घेतलेले नाही.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, दि. ८.१२.२००९ चे डॉकेट आहे हुडको या संस्थेचे व्याजदर कमी असल्यामुळे मनपा प्रॉपर्टि तारण ठेवून २०० कोटी कर्ज घेण्यासाठी प्रस्तूत विषय स्थायी समितीपुढे ठेवणेत यावा असे आयुक्तांच्या सहिचे डॉकेट आहे आणि वर्तमानपत्रामध्ये आयुक्त साहेब म्हणतात आम्ही तारण ठेवणार नाहीत.

मा.महापौर :- तारण ठेवण्याकरिता महापालिका सभेनी मान्यता दिलेली नाही. तारण ठेवण्याकरिता विषय येईल त्यावेळेला महापालिका सभेची मान्यता देण्यात येईल.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, १७ डिसेंबर २००७ चे महाराष्ट्र शासनाचे पत्र आहे, महाराष्ट्र शासनाने पुणे महापालिकेला पाठविलेले आहे. अशाप्रकारचे कर्ज घेत असताना महापालिकेनी कुठल्या कुठल्या गोष्टीची पुर्तता करावी याचा तपशीलवार उल्लेख आहे. आपण सुध्दा पत्र पाठविलेले आहे त्याचे सुध्दा स्पष्टीकरण करावे आणि महसूली उत्पन्न म्हणजे काय हे सांगावे.

मा.महापौर :- राज्यशासन आणि केंद्रशासन यांच्याकडील निधीसाठी प्रयत्न चालू आहेत.

मा.लोंढे :- मा.महापौर साहेब, हुडको हा भारत सरकारचा उपक्रम आहे या संस्थेकडे आपण २०० कोटीचा प्रस्ताव दिलेला आहे. या २०० कोटीवर ७.२५ % फ्लोटींग व्याजदर आहे. आपण कुठल्याहीप्रकारे तारण ठेवलेले नाही. शासनाने २०० कोटीचे कर्ज उभारण्यासाठी तत्वत: परवानगी दिलेली आहे. हुडको बरोबर अद्यापपर्यंत कुठलाही करारनामा झालेला नाही.

मा.बाबू नायर :- मा.महापौर साहेब, एमआयडीसी,प्राधिकरण,म्हाडा अशा तीन संस्था पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. या तीन्ही संस्थांचे नागरीकांच्या सुविधेसाठी ओपनस्पेस भूखंड आहेत ते एकतर महापालिकेकडे ताब्यात दिलेले नाहीत किंवा विकसीत करुन देणे आवश्यक आहेत ते होत नाही. म्हाडाच्या संदर्भात बोलतो, मोरवाडीच्या चार जागा विकसीत करण्यासाठी अजून ताब्यात आलेल्या नाहीत. दोन ताब्यात दिलेल्या आहेत एक देण्यात येणार आहे आणि एक आलेली नाही. म्हाडाच्या संदर्भात काय पाठपुरावा केलेला आहे आणि म्हाडा का ताब्यात देत नाही याची माहिती दयावी. एमआयडीसीचे अनेक भूखंड आहेत किंवा रस्त्यासाठीच्या जागा आहेत त्याच्याबाबतीत महापालिकेकडून कुठलाही पाठपुरावा केला जात नाही त्यासाठी काय कालावधी राहणार आहे याबाबत माहिती दयावी.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, म्हाडा एमआयडीसीची माहिती मागीतली आहे. यामध्ये एमआयडीसी मधील पिंपरी चिंचवड महापालिका नियोजन आराखडयानुसार किती जागेची मागणी केली हा प्रश्न आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेतील एमआयडीसी कार्यक्षेत्रातील आरक्षणांचा जागांचा गोषवारा दिलेला आहे त्यामध्ये अ.क्र. ७ मध्ये आरक्षण क्र. ४६ कुस्तीगीर केंद्र मनपाच्या ताब्यात आहे असे लिहिलेले आहे. त्या जागेत आपण लांडगे कुस्ती हॉल बांधलेला होता त्याच जागेवर पुन्हा कुस्तीसंकुल उभे करण्या संदर्भात विषय आयुक्तांकडून आलेला होता त्याला मंजुरी दिलेली होती. ते पाच कोटीचे काम महापालिकेनी काढलेले होते. आपल्या ताब्यात एमआयडीसीची जागा आहे तरी हे काम करण्यास आपल्याला काय अडचण येते याचा खुलासा करावा. आम्ही वारंवार आयुक्तांची,संबंधित अधिका-यांची मिटिंग घडवून आणलेली होती त्यात ताब्यात नाही असे म्हणाले होते. तरी याचा खुलासा करावा.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, कुस्ती केंद्रासाठी जागा मनपाच्या ताब्यात आहे आणि मिटिंग घेतली त्यावेळेला ताब्यात नाही असे सांगीतले याचा खुलासा करावा. बांधकाम व्यावसायीकाना टिडीआर द्यायचा म्हणलेतर अशा विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी खालच्या अधिका-यांना वेळ मिळतो आणि डीपीचा रोड ताब्यात घेण्यासाठी वेळ मिळत नाही. तरी याचा सुध्दा पाठपुरावा करावा.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, भोसरी एमआयडीसीची जागा कुस्तीकेंद्रासाठी महापालिकेच्या ताब्यात आलेली होती त्याच्यामध्ये पुर्वी लांडगे क्रिडा केंद्र उभारलेले होते त्यामध्ये ५ कोटीचे काम आहे, टेंडर ओपन झालेले होते परंतु प्रत्यक्षात काम सुरु करण्याच्या दृष्टिने पुढे अडचण आली. तेथील बिल्डींग परमिशनचे अधिकार एमआयडीसीकडे आहेत. ही प्रॉपर्टि महापालिकेच्या ताब्यात आलेली आहे व प्लॅन मंजूरीचे अधिकार त्यांच्याकडे आहेत. आपण प्रयत्न करुन प्लॅनिंग मंजूरीचे अधिकार महापालिकेकडे घ्यावेत. जशी भोसरीची अडचण आली तशा अडचणी इतर रिझर्व्हेशनच्या बाबतीत आहेत, तरी रिझर्व्हेशन ताब्यात आल्यानंतर त्याचे मंजूरीचे अधिकार आपल्याकडे पाहिजेत असे प्रयत्न करावेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आपण २०० कोटी कर्ज घेतो आहोत ५० टक्के कामाला वर्कऑर्डर दिलेली आहे, बाकी वर्कऑर्डर दिलेल्या नाहीत. ते नजीकच्या काळात होईल असे वाटत नाही. प्लॉट आपल्या ताब्यात नाहीत असे आयुक्तांनी सांगीतले, मग ६५०० घरासाठी कर्ज काढायचे का. आयुक्त साहेबांनी पेपरला चुकिची बातमी दिली आहे. वॉर्डस्तरीय कामासाठी तीन वर्षात ४०४ कोटी दिलेले आहेत अशी चुकिची बातमी दिलेली आहे.

मा.भिमा बोबडे :- मा.महापौर साहेब, एमआयडीसी मधील जो रोड आलेला आहे बजाज ॲटोच्या मागच्या साईडचा तो एमआयडीसीने आपल्या ताब्यात दिला का नाही हे मला माहित नाही. गेली सात-आठ महिन्यापासून भोसरी पासून जो रोड आलेला आहे तो अजंठानगर,थरमॅक्स चौकापासून बजाज ॲटोपर्यंत मागच्या साईडचा हा रोड झालेला नाही त्याचे काय कारण आहे. त्याठिकाणी बरेचसे ॲक्सीडेंट झालेले आहेत. तो एमआयडीसीने आपल्या ताब्यात दिला का नाही याचा खुलासा करावा.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, मोरवाडी बद्यल प्रश्न विचारला होता. त्याचे लेआऊट बिल्डींग परमिशन विभागाने दिलेले आहेत. चार ओपनस्पेस दाखविल्या होत्या चारही जागेची आपण मागणी केलेली होती त्यापैकी एका जागेची मागणी दुस-या संस्थेनी केल्यामुळे त्यांनी तीन जागा दिलेल्या आहेत त्यापैकी दोन जागा ताब्यात मिळालेल्या आहेत व एक जागा काही दिवसात मिळेल. आतापर्यंत एमआयडीसीच्या काही रस्त्याचे आरक्षण आपल्याकडे आलेले आहे काही आरक्षणाबाबत हेड ऑफिसची परवानगी घेवून देणार आहेत. त्यांच्या तीन-चार बैठका झालेल्या आहेत. त्यांना विनंती केली आहे की निदान रस्त्याच्या जागेचीतरी तुम्ही वर्कींग एनओसी द्यावी त्यामुळे आपले काम होईल. मोबदल्याचा प्रश्न आहे तो वरिष्ठस्तरावर निर्णय होईल. कुस्ती केंद्राबद्यल एमआयडीसी मध्ये ओपनस्पेस आहे परंतू १९९५ च्या डीपीमध्ये आपले आरक्षण आले. एमआरटीपी ॲक्टमध्ये एमआयडीसीला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषीत केले आहे. जो डीपी मान्य झालेला आहे हा डीपी त्यांना बंधनकारक राहिल असे आहे, त्यासाठी

त्यानी परवानगी द्यायला पाहिजे.  प्लॅनिंग अॅथॉरिटीचे अधिकार आपल्याकडे घ्यावेत अशी सूचना आलेली होती त्याबाबत प्रयत्न करण्यात येतील.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, याच्या अगोदर आपण त्यांची परवानगी घेतली होती का.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, याबाबत आता

माझ्याकडे माहिती नाही माहिती घेवून सांगतो.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, जी बिल्डींग आपण केली ती काहीच राहिलेली नाही. आपण त्याठिकाणी आपला खर्च केलेला आहे,महापालिकेनी पैसे खर्च केलेले होते.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, बांधकाम परवानगी घेतली का नाही हे मला माहित नाही.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, त्यावेळेला इमारत बांधली त्याची परमिशन घेतली का नाही असे विचारले आहे, त्यावर पाटिल साहेबांनी सांगीतले मला माहित नाही.  परवानगी न घेता महापालिका इमारत बांधेल का. अशा पध्दतीने अधिकारी उत्तर देतात.

मा.अति.आयुक्त :- मा.महापौर साहेब, ९४ पर्यंत महापालिका प्लॅनिंग ऑथॉरिटी होती,महापालिकेकडे  बांधकाम परमिशन असताना ही इमारत बांधलेली असावी.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, बिल्डींग परमिशनकडे त्याची नोंद असेल, त्याचा खुलासा व्हायला पाहिजे. ९४ पर्यंत आपण प्लॅनिंग ऑथॉरिटी होतो असे डूंबरे साहेबांनी सांगीतले आहे. अशा पध्दतीने महापालिकेच्या वतीने शासन लेव्हलला प्रयत्न झाले पाहिजेत हा कुस्ती केंद्राचा प्रश्न कसा ताबडतोब मार्गी लागेल हे बघावे.

मा.बाबू नायर :-  मा.महापौर साहेब,  म्हाडाच्या चार जागा आहेत प्लॅनिंग अॅथॉरिटी  पीसीएमसी आहे.  १४ भूखंडावर रिझर्व्हेशन दाखविलेले आहे.

बिल्डींग परमिशनकडून  कम्प्लीशन घेतलेले असेलतर म्हाडा ती जागा का देत नाही. आयुक्त व सी.ओ. यांची बैठक झालेली आहे, खाजगी संस्थेनी जागा मागीतलीतर ती द्यायची का नाही हे ठरवावे लागेल. आपण प्रायव्हेट बिल्डर्सला बिल्डींग परमिशन देताना जे ओपन स्पेस आहे ते विकसीत करुन द्यायचे असे सांगतो. आजपर्यंत याजागा ताब्यात येत नाहीत. त्याठिकाणी १४०० नागरीक राहतात त्यांना  सुविधा मिळाल्या पाहिजेत. म्हाडाच्या अटि व शर्ती पाहिल्यातर तुम्हांला सरप्राईज दिले अशा पध्तीच्या अटि व शर्ती आहेत. चार भूखंडाच्या संदर्भात काय झाले हे सांगावे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, कुठलाही विषय आल्यानंतर अधिकारी अंगाला तेल लावल्यासारखे उत्तर देत असतात. याची माहिती घेतली जाईल, नंतर उत्तर दिले जाईल, तेवढा महिनाभराचा कालावधी काढला जातो व अधिकारी सहिसलामत सुटले जातात. एखादया प्रश्नाबाबत सदस्यांनी शंका निर्माण केलीतर त्याचे निरसन केले पाहिजे. महेश लांडगे बोलत असताना पाटिल साहेब कानाला फोन लावून बाजूला जातात हे योग्य नाही. उत्तर देत असताना अशाप्रकारे त्यांनी केलेले वर्तन अपमान करणारे आहे, त्यांनी सभागृहाची माफी मागावी नंतर पुढचा विषय घेणेत यावा.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, मगाशी मा.महेश लांडगे यांनी प्रश्न विचारला होता त्यावेळेला मी बिल्डींग परमिशनला फोन लावत होतो त्यामुळे कदाचित सभागृहाच्या भावना दुखावल्या असतीलतर मी दिलगिरी व्यक्त करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, चर्चेतून काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. प्रश्नोत्तरामध्ये जवळपास तीन विभागाचे वेगवेगळे प्रश्न आहेत. एका सन्मा.सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर दुस-या सन्मा.सदस्यांनी प्रश्न विचारलातर त्या विषयाचे गांभीर्य राहत नाही. पहिल्या सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर अगोदर दिले

पाहिजे. पुढील कालावधीमध्ये प्रश्नोत्तरे घेत असताना एका विषयाशी संबंधीत प्रश्न घेतलातर तो प्रश्न तडीस जाईल. एकंदरीत सगळा कारभार पाहिलातर त्याचा मी साक्षीदार आहे, गेली अनेक वर्षे बहुमताने आपली सत्ता या महापालिकेमध्ये आहे म्हणून महापालिकेचे दिवाळे निघालेले आहे. चुकिच्या निवीदा पध्दत, ठेकेदार पोसण्याचे राजकारण यामुळे या महापालिकेची आर्थिक परिस्थिती ढासळलेली आहे. आज सगळीकडचे काम रखडलेले आहे. शहरातील करदाता नागरीक जीव मुठीत घेवून रस्त्यावरुन जातो अशी बिकट परिस्थिती आहे. शहरामध्ये नियोजनाची गरज आहे आणि नियोजन करत असताना आपल्या तिजोरीमध्ये किती पैसे आहेत त्याचा सुध्दा अंदाज आपल्याला व्हावा आणि भविष्यामध्ये चुकिचे काम होऊ नये सन्मा.सदस्यांचे उत्तर राहिले असतीलतर ते दयावे.

मा.महापौर :- मा.सदस्यांना विनंती करतो की अधिकारी बोलत असताना सदस्यांनी सुध्दा त्यांचे मोबाईल बंद ठेवावेत किंवा सायलेण्टवर ठेवावेत कारण माईक चालू असतो त्यामुळे व्यवस्थीत ऐकू येत नाही. पाटिल साहेबांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, तीन ओपनस्पेस आहेत त्या त्यांनी देखभालीसाठी दिलेल्या आहेत.

मा.बाबू नायर :- मा.महापौर साहेब, ओपन स्पेस देखभालीसाठी दिलेल्या आहेत, डेव्हलपमेंटसाठी द्यायला पाहिजेत.

मा.महापौर :- म्हाडा आपल्याकडून बिल्डींग परमिशन घेते. प्लॅनिंग ॲथॉरिटी आपण आहोत.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, जे लेआऊटमधील ओपनस्पेस तेथील नागरीकांच्या सुविधेसाठी असतात, त्यांची डेव्हलपमेंट करुन मेन्टेनन्स करणे अपेक्षीत असते.

मा.महापौर :- त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी डेव्हलपमेंट केलेले नाही. मग काय करायचे.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, तशा कंडीशन्स घालाव्या लागतील.

मा.महापौर :- महेश लांडगे, अजीत गव्हाणे यांनी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे कुस्तीकेंद्राचे ताबडतोब टेंडर काढून ते लवकरात लवकर बांधण्यात यावे प्रश्नोत्तरे संपलेली आहेत, पुढील विषय घ्यावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/१२५०/०९ दि.३०/७/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८८७५ दिनांक ६/०८/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६० दि.२१/१२/२००९ अन्वये

झोपडपट्टीतील रहिवाश्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असले मुळे त्यांना इतर नागरीकांपेक्षा कमी दराने पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. मीटर पध्दत अवलंबण्यापुर्वी पाणीपट्टी दर फ्लॅट पध्दतीने र.रू.१,२७६/- व झोपडपट्टीसाठी र.रू.८८५/- असा होता. यामध्ये झोपडपट्टी धारकांसाठी ३०% प्रमाणात कमी दर असल्यामुळे मीटर पध्दतीने दर हजार लिटर्स र.रू.२=५० च्या दरात ३०% प्रमाणात कमी दर म्हणजे दरमहा ३०,००० लिटर साठी रूपये १=७५ प्रती दर

हजार लिटर्ससाठी व दरमहा ३०,००० लिटर्स वरील पाणी वापरासाठी यापुर्वीचे मीटर पध्दतीच्या दराने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील लाभधारकांना तसेच अधिकृत झोपडपट्टीधारकांना पाणी दर आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जगन्नाथ साबळे :-मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ॲटो क्लस्टरला मिटिंग आयोजित केलेली होती. त्यामध्ये दर ठरविण्यात आलेले आहेत. निवासी पाणी वापराकरिता र.रु. ७/-प्रति हजार लिटर ऐवजी र.रु. ५.५०/-प्रति हजार लिटर केलेला आहे आणि

कमर्शिअलसाठी ३० ऐवजी ४० करणेत आलेला आहे. माझी विनंती आहे की पुर्वीचा रेट ३०/- होता आणि आता ४०/- केलेला आहेतर त्याऐवजी ३५/- असा करणेत यावा. आपण स्लॅबचे रेट कमी करत असताना कमर्शिअल रेट जास्त वाढविलेला आहे. शहरामध्ये एसटीडी बुथ पासून हॉटेल पर्यंत सगळया लोकांचा हा प्रश्न आहे. ब-याचशा लोकांनी निवेदनही दिलेले आहेत.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- निवासी पाणी वापराकरीता ३०,००१ ते ५०,००० लिटर्स करीता असलेला दर र.रु.७.०० प्रति हजार लिटर्स ऐवजी र.रु.५.५० प्रति हजार लिटर्स व बिगर निवासी वापराकरीता र.रु.३०/- प्रति हजार लिटर्स ऐवजी र.रु.३५/- प्रति हजार लिटर्स असा बदल करणेबाबत मा.महापौर यांनी दिनांक १३/०१/२०१० रोजी पाणी प्रश्नाबाबत घेतलेल्या बैठकीमधील निर्णयानुसार कार्यवाही करण्यास व सदरचे दर १ एप्रिल २०१० पासुन लागु करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, पाणी मीटरचा विषय आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये मिटरप्रमाणे वेगवेगळया भागामध्ये पाण्याचे बील वाटण्यात आलेले आहे. काही ठिकाणी नागरीकांना पाणीपट्टी आलेली आहे, काही ठिकाणी

हवापट्टी आलेली आहे. संपुर्ण शहरातील नागरीक पाण्याच्या विषयावर हवालदिल झालेले आहेत. हा झोपडपट्टीवासीयांचा विषय आहे,झोपडपट्टीमध्ये मीटरप्रमाणे पाणीपट्टी अकारण्याचा विषय आहे. झोपडपट्टीवासीयांना ३० हजार लिटरसाठी रुपये १.७५ असा दर आकारण्याचा विषय आपण आणलेला आहे. १७.१.२००९ रोजी एक पत्र महापालिकेमध्ये संबंधीत विभागाला दिलेले आहे. पुण्यामध्ये पुनर्वसीत झालेल्या झोपडया आहेत त्या धरतीवर याठिकाणीही पुनर्वसीत झालेल्या झोपडपट्टया आहेत त्यांच्या बाबतीत राज्यशासनाच्या सूचना आहेत त्या सूचना पुणे महापालिका पाळते. त्याप्रमाणे त्याठिकाणी पुनर्वसीत झोपडपट्टयासाठी र.रु. ३००/- वार्षिक पाणीपट्टी आकारण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. आपल्याकडे पुनर्वसीत झालेल्या झोपडपट्टया आहेत त्याठिकाणी सुध्दा आपण मिटरप्रमाणे पाणीपट्टी आकारणार आहोत व इतर ठिकाणी सुध्दा मीटर प्रमाणे लावणार आहोत. मागच्या मिटिंगमध्ये मी विचारले होते की, शहरामध्ये किती मिटरग्राहक आहेत, किती मिटर लावलेले आहेत त्यापैकी प्राधिकरण, सोसायटयामधील किती मिटर चोरीला गेलेले आहेत. झोपडपट्टीवासीयांसाठी पाण्याचा दर आकारत असताना शासनाच्या सूचना आहेत. पुणे महापालिका शासनाच्या सूचनेप्रमाणे

झोपडपट्टीमध्ये पाणीपट्टीची आकारणी करते. त्याठिकाणी पुनर्वसीत

झोपडपट्टीमध्ये वार्षीक र.रु. ३००/- पाणीपट्टी आहे. तसेच करामध्ये सुध्दा सवलत मिळावी अशा शासनाच्या सूचना आहेत, त्याची अंमलबजावणी पुणे

महापालिका करते. उल्हास शेट्टी यांनी जी सूचना दिली त्याला सुध्दा मी पाठिंबा देतो. आपण सोसायटया आणि अपार्टमेंटला पाणीपट्टी त्याठिकाणी १० जण असलेतरी १० x ३०,००० असे आकारणार आहोत. चाळीमध्ये सुध्दा मालकाची सम्मती नसताना नवीन नळकनेक्शन देणार आहोत. परंतु अर्धा इंचीनळ कनेक्शन असेलतर त्यांना र.रु २.५० आहे. आम्ही म्हणतो स्लॅब पध्दत नसावी, सरासरी र.रु. २.५० प्रति हजार लिटरला अशाप्रकारचा विषय केलेला असताना सभागृहाने

विषय फेटाळून लावलेला आहे. चाळवाल्यांचा,सोसायटीवाल्यांचा, अपार्टमेंटवाल्यांचा, ग्रामीण भागाचा विचार करावा. ग्रामीण भागामध्ये सुध्दा अशाप्रकारची पाणीपट्टी आकारणार असालतर त्यांच्याकडून सुध्दा विरोध होणार आहे. पाण्याचा प्रश्न हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आपली मिटिंग झालेली असलीतरी त्याठिकाणी २५ नगरसेवकांमध्ये निर्णय होत नसतो, हे सभागृह आहे.

मा.महापौर :- आम्ही सर्व नगरसेवकांना पत्र दिलेले होते. सर्वांना फोन केलेले होते. सर्वानी मिळून तो निर्णय घेतलेला आहे. आपण विषयावर बोलावे, सभागृह निर्णय घेईल.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, ज्या पुनर्वसीत झोपडपट्टया आहेत, से-२२ मध्ये वेताळनगर,मिलिंदनगर आणि त्याच्या आगोदरच्या ज्या झोपडपट्टया पुनर्वसीत झाल्या त्याठिकाणी मिटर लावणार आहोत. ज्यांचे पुनर्वसन झालेले नाही त्याठिकाणीही मिटर लावणार आहोत.झोपडपट्टीमध्ये मिटर पध्दत लावणे अन्यायकारक आहे. झोपडपट्टीवाल्यांना पुणे महापालिकेच्या धरतीवर वार्षिक र.रु.३००/- पाणीपट्टी आकारावी अशा शासनाच्या सूचना आहेत. व त्याची पुणे महापालिकेनी अंमलबजावणी केलेली आहे त्याप्रमाणे आपणही करावे. ज्याठिकाणी मिटर पध्दत राबविलेली आहे त्याठिकाणच्या लोकांना काय त्रास होतो हे माहित आहे. हॉटेलमालक असतील, व्यापारी असतील त्यांना सुध्दा त्रासदायक आहे या सर्वाचा विचार केला पाहिजे. हा सर्व विचार करुन आपण योग्य तो निर्णय घ्यावा. हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा आहे. यावर सविस्तर चर्चा करुन जनतेला त्रास होणार नाही असा निर्णय घेणेत यावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ज्या पुनर्वसीत झोपडपट्टया झालेल्या आहेत त्या लोकांना पुणे महापालिका पाणीपट्टी ३००/- रुपये लावत असेलतर आणि शासनाचा तसा आदेश,जीआर असेलतर याठिकाणी जो र.रु. १.७५ चा

विषय करतो आहोत त्याला विरोध राहणार आहे, उपसूचना स्विकारली जाणार नाही. झोपडपट्टी संदर्भात भापकर म्हणाले त्याप्रमाणे खरे असेलतर अधिका-यांनी खुलासा करावा.

मा.महापौर :- उपसूचना स्विकारली गेली नाहीतर रेट ७.०० प्रमाणे राहणार आहे. शासनाचा जीआर नाही शासनाच्या सूचना आहेत.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे. मारुती भापकर यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे व तसा शासनाचा निर्णय असेलतर व पुणे महापालिका पुनर्वसीत झोपडपट्टीधारकांसाठी ३००/- रुपये घेत असेलतर आपली महापालिका त्याप्रमाणे का करत नाही याचा खुलासा करावा.

(गोंधळ)

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, सुरवातीलाही बरीचशी चर्चा

झालेली आहे पाणीप्रश्नासंदर्भात महापौरांनी अगोदर मिटिंग घेतलेली होती. त्यादिवशी चर्चा झाल्यानंतर जो निर्णय झालेला आहे तोच निर्णय याठिकाणी जीबीला वाचून दाखविण्यात आलेला आहे. तरी सुध्दा काही उपसूचना असतीलतर नगरसदस्यांना तो अधिकार आहे. ॲटो क्लस्टरला मिटिंग झालेली होती त्या अनुषंगाने आपण विषय आणलेला आहे. फक्त एक महत्वाचा प्रश्न उल्हास शेट्टी यांनी मांडलेला आहे की कमर्शिअल दर ३० ऐवजी ३५ करावेत. आणि तानाजी खाडे यांनी म्हणलेले आहेत की शासनाचे तसे आदेश असतीलतर आपण सुध्दा त्याप्रमाणे सहानुभूतीपुर्वक विचार करावा. आतापर्यंत इतर सगळया महापालिकेशी तुलना केलीतर आपल्या महापालिकेचे दर कमीच आहेत आणि पाण्याच्या बाबतीत आपले दर संपुर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये कमी आहेत. हा पहिल्यांदाच दरवाढीचा विषय आहे. राज्यशासनाचा तसा जी.आर. असेलतर

त्याबाबत माहिती घेवून निर्णय घ्यावा, घाईघाईने निर्णय घेवू नये.

मा.महापौर :- शासनाचा तसा जी.आर नाही, सूचना आहेत. प्रशासनाने तपासून घ्यावे व झोपडपट्टी संदर्भात तसे करता येत असेलतर बघावे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून निर्णय घ्यावा. झोपडपट्टीवासियां विरोधात हा विषय होईल.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, मागच्या आठवडयामध्ये जी ॲटो क्लस्टरला मिटिंग झालेली होती त्यामध्ये सर्व सभासदाचे मुद्दे असे होते की शहराला समान पध्दतीने पाणी वाटप झाले पाहिजे. २४ तास पाणी वाटपाचे आश्वासन देवून दोन वर्षे झालेली आहेत. मिटर बसविल्यानंतर सर्व शहराला २४ तास आणि समान पाणी मिळेल असे आश्वासन दिलेले होते ते पाळले गेले नाही.

काही भागात एक,दोन, तास पाणी येते. त्यादिवशी चर्चा झाली, निर्णय झालेला नाही. असे असताना आज परत तोच विषय मिटिंग मध्ये मंजूरीला येतो आहे तो आम्हांला मान्य नाही. सर्वाना एकाच पध्दतीने रेट ठरवावे ज्याचा जास्त वापर होईल त्याला जास्त बील येणार आहे व ज्याचा कमी वापर होईल त्याला कमी बील येईल. स्लॅब पध्दतीला आमचा विरोध आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, आता हा विषय मंजूर केला आणि उदया या या रेटने दयावे असा राज्यशासनाने जीआर काढलातर पुन्हा दुरुस्ती करता येईल का.

मा.महापौर :- दुरुस्ती करता येईल, जी.आर. असेलतर तो आपल्यावर बंधनकारक आहे.

(गोंधळ)

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, उपसूचना नाकारल्यानंतर स्विकारता येते का याचा खुलासा करावा.

(मा.नगरसचिव यांनी सभा कामकाज नियमाचे वाचन केले)

मा.महापौर :- खाडे साहेबांनी व आझमभाई पानसरे यांनी जीआरचा उल्लेख केल्यानंतर मी सांगीतले शासनाच्या त्या सूचना आहेत,जी.आर. नाही तेव्हा खाडे साहेबांनी बदल केलेला आहे. जी.आर. आहे का सूचना आहेत हे पडताळून पाहतील,असे त्यांना सांगीतल्यानंतर त्यांनी उपसूचना स्विकारली आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेबांनी खुलासा केल्यानंतर मी उपसूचना स्विकारली आहे.

मा.रघुनंदन घुले :- मा.महापौर साहेब, झोपडपट्टीवासियांचा विषय आहे मुळ विषयाला विरोध आहे, उपसूचनेला विरोध नाही स्लॅब पध्दतीला विरोध आहे.

मा.भिमा बोबडे :- मा.महापौर साहेब, मुळ विषयाला विरोध आहे, उपसूचनेला विरोध नाही स्लॅब पध्दतीला विरोध आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, मुळ विषयाला विरोध आहे, उपसूचनेला विरोध नाही स्लॅब पध्दतीला विरोध आहे.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, आमचा स्लॅब पध्दतीला विरोध आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७८५ विषय क्रमांक :- १

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/१२५०/०९ दि.३०/७/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८८७५ दिनांक ६/०८/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६० दि.२१/१२/२००९

अन्वये

झोपडपट्टीतील रहिवाश्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असले मुळे त्यांना इतर नागरीकांपेक्षा कमी दराने पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. मीटर पध्दत अवलंबण्यापुर्वी पाणीपट्टी दर फ्लॅट पध्दतीने र.रू.१,२७६/- व

झोपडपट्टीसाठी र.रू.८८५/- असा होता. यामध्ये झोपडपट्टी धारकांसाठी ३०% प्रमाणात कमी दर असल्यामुळे मीटर पध्दतीने दर हजार लिटर्स र.रू.२=५० च्या दरात ३०% प्रमाणात कमी दर म्हणजे दरमहा ३०,००० लिटर साठी रूपये

१=७५ प्रती दर हजार लिटर्ससाठी व दरमहा ३०,००० लिटर्स वरील पाणी वापरासाठी यापुर्वीचे मीटर पध्दतीच्या दराने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील लाभधारकांना तसेच अधिकृत झोपडपट्टी धारकांना पाणी दर आकारणेस मान्यता देणेत येत आहे. निवासी पाणी वापराकरीता ३०,००१ ते ५०,००० लिटर्स करीता असलेला दर र.रु.७.०० प्रति हजार लिटर्स ऐवजी र.रु.५.५० प्रति हजार लिटर्स व बिगर निवासी वापराकरीता र.रु.३०/- प्रति हजार लिटर्स ऐवजी र.रु.३५/- प्रति हजार लिटर्स असा बदल करणेबाबत मा.महापौर यांनी दिनांक १३/०१/२०१० रोजी पाणी प्रश्नाबाबत घेतलेल्या बैठकीमधील निर्णयानुसार कार्यवाही करण्यास व सदरचे दर १ एप्रिल २०१० पासुन लागु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-४७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६१ दि.२१/१२/२००९ अन्वये

पिंपरी चिंचवड मनपा परिवहन उपक्रमाकरिता आरक्षित असलेल्या तसेच मनपाच्या ताब्यात असलेल्या जागा / विकसीत मालमत्ता पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांना हस्तांतरण करणेकामी प्रस्तावात नमुद जागा/मालमत्ता यांचे चालू बाजारभावा प्रमाणे किंमत निश्‍चिती साठी बराच कालावधी लागणार आहे तथापि अध्यक्ष व व्यवस्थापक संचालक पी एम पी एम एल यांची दि.२४/४/०९ व १२/५/०९ चे पत्रान्वये जागा/मालमत्ता मागणी विचारात घेता प्रस्तावात नमुद प्रमाणेचे क्र.१ ते ६ मधील आरक्षित जागा विकसित केलेल्या मालमत्ता या प्रस्तावात नमुद प्रमाणेचे अट क्र. १ ते ११ अटीनुसार तसेच दि.१९/४/०७ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे नियोजित कंपनी पी एम पी एम एल यांना चालू बाजार भाव नुसार मा.उपसंचालक नगररचना निश्‍चित करतील त्या मुल्यांकनास/किंमतीस अधिन राहून प्रस्तावा प्रमाणेच्या १ ते ६ मधील मनपा मालकीच्या व दिर्घ मुदत करारनामा व्दारे ताब्यात आलेल्या जागा/मालमत्ता कायद्याचे कलम ७९ (क) अन्वये तसेच परिवहन उपक्रमासाठी आरक्षित असलेल्या इतर मनपा मिळकती प्रस्तावा प्रमाणेचे मनपा अटीनुसार पी एम पी एम एल नावे हस्तांतर करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७८६ विषय क्रमांक :- २

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६१ दि.२१/१२/२००९
अन्वये

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७८७ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.वृक्ष/५/कावि/८४२/०९
दि.२४/११/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९९१६ दिनांक ०८/१२/२००९

मनपाच्या वृक्षप्राधिकरणाचे सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या वृक्ष प्राधिकरण ठराव क्र.५२ दि.३०/१०/२००९चे तपशिलाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.
मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.प्रशांत शितोळे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९९८७ दिनांक
०८/१२/२००९

स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावर सन २००९-१० चे अंदाजपत्रकामध्ये असलेली तरतूद कमी पडत असून उद्यानातील कामे मार्गी लावण्यासाठी र.रु.९०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक असल्याने संगणक विभागाचे संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षावरुन र.रु.९०,००,०००/- तरतूद कमी करुन ती स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

वॉर्ड क्र.५७ किवळेमध्ये विशेष योजने अंतर्गत खालिल विकास कामांना सन २०१०-११ साठी तरतुद करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | सन २०१०-११ चा अंदाज | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | नवीन समाविष्ठ गावांची विविध विकासाची काम करणे | | |
| | १) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील रस्ते खडीमुरुम व बीबीएम पध्दतीने करणे. | ३,००,००,०००/- | |
| | २) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील रस्त्याचे कडेने गटर नाला बांधणे | २,००,००,०००/- | |
| | ३) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणे. | ३,००,००,०००/- | |
| | एकूण | ८,००,००,०००/- | |

[उपरोक्त कामे नव्याने समाविष्ट किवळे, विकासनगर, मामुर्डी या अतिमोठ्या प्रभागातील असल्याने सदर भागातुन विविध विकास कामांसाठी नागरिकांकडुन जोरदार मागणी होत आहे.] स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावर सन २००९-१० चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.१०,००,४०,०००/- तरतूद

करण्यात आलेली आहे. सदर तरतूद कमी पडत असून उद्यानातील कामे मार्गी लावण्यासाठी र.रु.५०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे. स्थापत्य ड- प्रभागाचे "इतर विशेष योजना- ११/२, पिंपरीवाघेरे येथील आ.क्र.१५४ येथे जलतरण तलाव बांधणे याकामावरुन" या लेखाशिर्षावरुन

र.रु.५०,००,०००/- तरतूद कमी करुन ती स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावरील काम- पिंपरी वाघेरे सिटी सर्व्हे नं.१४४/५ ते १० आ.क्र.१६६ येथील आरक्षणाच्या जागेत उद्यान विकसीत करणे यावर वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७८८ विषय क्रमांक :- ४

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.प्रशांत शितोळे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९९८७ दिनांक
०८/१२/२००९

स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावर सन २००९-१० चे अंदाजपत्रकामध्ये असलेली तरतूद कमी पडत असून उद्यानातील कामे मार्गी लावण्यासाठी र.रु.९०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक असल्याने संगणक विभागाचे संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षावरुन र.रु.९०,००,०००/- तरतूद कमी करुन ती स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. वॉर्ड क्र.५७ किवळेमध्ये विशेष योजने अंतर्गत खालिल विकास कामांना सन २०१०-११ साठी तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | सन २०१०-११ चा अंदाज | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | नवीन समाविष्ठ गावांची विविध विकासाची काम करणे | | |
| | १) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील रस्ते खडीमुरुम व बीबीएम पध्दतीने करणे. | ३,००,००,०००/- | |
| | २) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील रस्त्याचे कडेने गटर नाला बांधणे | २,००,००,०००/- | |
| | ३) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणे. | ३,००,००,०००/- | |
| | एकूण | ८,००,००,०००/- | |

[उपरोक्त कामे नव्याने समाविष्ट किवळे, विकासनगर, मामुर्डी या अतिमोठ्या प्रभागातील असल्याने सदर भागातुन विविध विकास कामांसाठी नागरिकांकडुन जोरदार मागणी होत आहे.] स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावर सन २००९-१० चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.१०,००,४०,०००/- तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद कमी पडत असून उद्यानातील कामे मार्गी लावण्यासाठी र.रु.५०,००,०००/- ची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे. स्थापत्य ड- प्रभागाचे "इतर विशेष योजना- ११/२, पिंपरीवाघेरे येथील आ.क्र.१५४ येथे जलतरण तलाव बांधणे याकामावरुन" या लेखाशिर्षावरुन र.रु.५०,००,०००/- तरतूद कमी करुन ती स्थापत्य- २अ) उद्याने या लेखाशिर्षावरील काम- पिंपरी वाघेरे सिटी सर्व्हे नं.१४४/५ ते १० आ.क्र.१६६ येथील आरक्षणाच्या जागेत उद्यान विकसीत करणे यावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७५ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ५

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.नितीन ओव्हाळ, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९९९० दिनांक ०८/१२/२००९

पुणे श्रमीक पत्रकार संघास फोटोबुक साठी मनपातर्फे र.रु.२,५०,०००/- अनुदान पुणे श्रमीक पत्रकार संघाचे नावे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जगन्नाथ साबळे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार दि.२०/७/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७८९ विषय क्रमांक :- ५

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.नितीन ओव्हाळ, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९९९० दिनांक ०८/१२/२००९

विषय क्रमांक ५ चा विचार दि.२०/७/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल -७५ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७९० विषय क्रमांक :- ६

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक जकात/१०/कावि/५४६/
२००९ दि.३०/१२/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०१७८ दिनांक ०५/०१/२०१०

प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केले प्रमाणे सन २००९ - १० मध्ये असलेले जकात कराचे दर यात कोणतीही वाढ/घट न करता सन २०१० - २०११ करीता कायम करणेस व जकात दर समानीकरणाचा प्रस्ताव हरकत सुचनांसह शासनाकडे सादर केला असून शासनाने मान्यता दिले नंतर सुधारित दराने सन २०१० - २०११ या आर्थिक वर्षात शासनाकडुन जे दर मान्य होउन येतील त्या शासन आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.
मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.वैशाली उबाळे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ७

दिनांक :- १९.१.२०१०

विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क मु,वाहतुक/कावि/४५७ /०९ दि.१६/२/०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९५ दिनांक १५/०५/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६४ दि.२१/१२/२००९ अन्वये

पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील निगडी जकात नाका व पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया मागील मोकळया जागा वाहनतळासाठी विकसीत करणेकामी र.रु.१,१७,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.आलका यादव :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो-

पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब अंाबेडकर पुतळया मागील मोकळया जागा वाहनतळासाठी विकसीत हा भाग वगळून पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील निगडी जकात नाका येथील मोकळया जागा वाहनतळासाठी विकसीत करणेस व विकसीत करताना जकात नाक्यांच्या संरक्षण भिंतीच्या बाजूने हॉकर्स झोनच्या धर्तीवर व्यापारी गाळे मनपा मार्फत बांधून भाडेतत्वावर स्थानिक महिला बचत गट व सुशिक्षित बेकारांना देणेस व त्याकामी र.रु.१,१७,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.जगन्नाथ साबळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, वाहनतळ करण्यासाठी, तीन मजली इमारत उभी करायची आहे. डॉ.बाबासाहेब अंाबेडकर चौक या शहरातील सर्व जनतेच्या अस्मितेचा चौक आहे. त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब अंाबेडकर यांचा पुतळा आहे. पिंपरी चिंचवड शहराला डॉ.बाबासाहेब अंाबेडकरांच्या पुतळयामुळे चांगल्या पध्दतीची ओळख आहे. त्याठिकाणी उदयान बनवावे आणि ही वास्तु या महापुरुषाच्या नावाने ठेवावी पुतळयामागे कुठल्याही प्रकारचे वाहनतळ नसावे.

मा.महापौर :- तानाजी खाडे यांनी त्यासाठीच उपसूचना मांडलेली आहे.

मा.वैशाली उबाळे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-७९१ विषय क्रमांक :- ७

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क
मु,वाहतुक/कावि/४५७ /०९ दि.१६/२/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९५ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६४ दि.२१/१२/२००९ अन्वये

पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील निगडी जकात नाका येथील मोकळया जागा वाहनतळासाठी विकसीत करणेस व विकसीत करताना जकात नाक्यांच्या संरक्षण भिंतीच्या बाजूने हॉकर्स झोनच्या धर्तीवर व्यापारी गाळे मनपा मार्फत बांधून भाडेतत्वावर स्थानिक महिला बचत गट व सुशिक्षित बेकारांना देणेस व त्याकामी र.रु.१,१७,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७५ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७९२ विषय क्रमांक :- ८

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्रप्रशा/१/कावि/३६३/२००९ दि.३०.०३.२००९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९८ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६५ दि.२१/१२/२००९
अन्वये

श्री.शहाजी पवार यांना करआकारणी व करसंकलन प्रमुख या र.रु.१०००० - १५२०० या वेतनश्रेणीतील पदावर नेमणुक देण्यात येउन या पदाचे महानगरपालिकेच्या मान्यतेस अधिन राहुन वेतनश्रेणीतील बदल न करता सहा.आयुक्त, कर आकारणी व करसंकलन असे पदनाम करणेत आले असल्याने श्री.शहाजी पवार यांची नियुक्ती १ वर्ष पुढे चालु ठेवणेस व पदनाम बदलास मान्यता देणेत येत आहे.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७९३ विषय क्रमांक :- ९

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८६/०९ दि.६/५/०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०२ दिनांक १५/०५/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६६ दि.२१/१२/२००९

अन्वये

श्री.सुभाष डुंबरे, अतिरिक्त आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २/४/२००९ पासून १ वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १०

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८३/०९ दि.६/५/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०४ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६७ दि.२१/१२/२००९

अन्वये

श्री.सुधाकर विष्णू देशमुख,सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ११/०६/२००९ पासून २ वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

डॉ.नागकुमार राजेंद्र कुणचगी हे सन १९८० पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत कार्यरत आहेत. त्यांना २९ वर्षांचा प्रशासकीय कामकाजाचा दिर्घानुभव असुन त्यांनी या सेवा काळात वैद्यकीय अधिकारी, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, स्थानिक आरोग्य प्राधिकारी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, निबंधक जन्म-मृत्यु, पर्यावरण कक्ष प्रमुख अशी अनेक पदे कार्यक्षमतेने व कुशलतेने संभाळली आहेत. त्यांनी सेवा काळात अनेक क्लिष्ट व अवघड प्रकल्प यशस्वीरित्या पुर्ण केले आहेत. उदा.यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाचे विस्तारीकरण व विकास, यामध्ये आय.सी.यु., एन.आय.सी.यु., कृत्रिम अवयव केंद्र, सी.टी.स्कॅन सेंटर, कॅन्सर युनिट, डायलिसीस युनिट इ. तसेच जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन प्रकल्पांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी त्यांनी DPR तयार केला असुन शासनाकडे पाठपुरावा करुन शासनाकडुन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पुर्ण करणेसाठी निधी मिळविला आहे. तसेच पवना सुधार प्रकल्प त्यांनी यशस्वीरित्या सांभाळला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अ नुसार पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार केला जात आहे. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, आण्णाभाऊ साठे जयंती, वाल्मिकी जयंती, महावीर जयंती, पवनाथडी जत्रा इ. कार्यक्रमांचे आयोजन व संयोजन मुख्य संयोजक म्हणुन यशस्वीरित्या पार पाडले आहे. तसेच स्थानिक आरोग्य प्राधिकारी म्हणुन त्यांनी अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. या अंतर्गत दुध तपासणी मोहिम, गुटखा मोहिम, सणासुदीच्या कालावधीमध्ये स्विटमार्टची तपासणी इ.मोहिमा प्रभावीपणे राबविल्या आहेत. त्यांचेकडे असलेले अनेक प्रकल्प उदा.यशवंतराव चव्हाण योजने अंतर्गत कॅन्सर युनिट पुर्ण क्षमतेने सुरु करणे, एम.आर.आय.युनिट सुरु करणे, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत चालु असलेले

प्रकल्प, जवाहरलाल नेहरु पुनरुत्थापन प्रकल्पांतर्गत पवना सुधार योजना, सांस्कृतिक कार्यक्रम, वैद्यकीय विभागाचे कामकाज व काही नविन प्रकल्पांचे कामकाज त्यांच्यामार्फत मनपास यशस्वीरित्या पार पाडून घ्यायचे आहे. डॉ.नागकुमार कुणचगी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या दिर्घ सेवाकालाचा, अनुभवाचा व शैक्षणिक अर्हतेचा मनपासेवांमध्ये अधिकाधिक उपयोग करुन घेणे जरुरीचे असल्याने व त्यांच्यासारख्या धडाडीच्या कर्तबगार, व हुशार अधिकाऱ्याच्या कार्यक्षम सेवेची पिंचिंमनपास आवश्यकता असल्याने विशेष बाब म्हणून डॉ.नागकुमार राजेंद्र कुणचगी यांना नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त करण्या ऐवजी त्यांना पिंचिंमनपा सेवेत आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर २ वर्षांची मुदत वाढ देणेस व त्याअनुषंगाने शासनाची मान्यता घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते. त्या अधिका-यांना विचारले पाहिजे की त्यांना मुदतवाढ पाहिजे का नको.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७९४ विषय क्रमांक :- १०

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८३/०९ दि.६/५/०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०४ दिनांक १५/०५/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६७ दि.२१/१२/२००९

अन्वये

श्री.सुधाकर विष्णू देशमुख,सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ११/०६/२००९ पासून २ वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे. डॉ.नागकुमार राजेंद्र कुणचगी हे सन १९८० पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत कार्यरत आहेत. त्यांना २९ वर्षांचा प्रशासकीय कामकाजाचा दिर्घानुभव असुन त्यांनी या सेवा काळात वैद्यकीय अधिकारी, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, स्थानिक आरोग्य प्राधिकारी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, निबंधक जन्म-मृत्यु, पर्यावरण कक्ष प्रमुख अशी अनेक पदे कार्यक्षमतेने व कुशलतेने संभाळली आहेत. त्यांनी सेवा काळात अनेक क्लिष्ट व

अवघड प्रकल्प यशस्वीरित्या पुर्ण केले आहेत. उदा.यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाचे विस्तारीकरण व विकास, यामध्ये आय.सी.यु., एन.आय.सी.यु., कृत्रिम अवयव केंद्र, सी.टी.स्कॅन सेंटर, कॅन्सर युनिट, डायलिसीस युनिट इ. तसेच जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन प्रकल्पांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी त्यांनी DPR तयार केला असुन शासनाकडे पाठपुरावा करुन शासनाकडुन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पुर्ण करणेसाठी निधी मिळविला आहे. तसेच पवना सुधार प्रकल्प त्यांनी यशस्वीरित्या सांभाळला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अ नुसार पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार केला जात आहे. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, आण्णाभाऊ साठे जयंती, वाल्मिकी जयंती, महावीर जयंती, पवनाथडी जत्रा इ. कार्यक्रमांचे आयोजन व संयोजन मुख्य संयोजक म्हणुन यशस्वीरित्या पार पाडले आहे. तसेच स्थानिक आरोग्य प्राधिकारी म्हणुन त्यांनी अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. या अंतर्गत दुध तपासणी मोहिम, गुटखा मोहिम, सणासुदीच्या कालावधीमध्ये स्विटमार्टची तपासणी इ.मोहिमा प्रभावीपणे राबविल्या आहेत. त्यांचेकडे असलेले अनेक प्रकल्प उदा.यशवंतराव चव्हाण योजने अंतर्गत कॅन्सर युनिट पुर्ण क्षमतेने सुरु करणे, एम.आर.आय.युनिट सुरु करणे, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत चालु असलेले प्रकल्प, जवाहरलाल नेहरु पुनरुत्थापन प्रकल्पांतर्गत पवना सुधार योजना, सांस्कृतिक कार्यक्रम, वैद्यकीय विभागाचे कामकाज व काही नविन प्रकल्पांचे कामकाज त्यांच्यामार्फत मनपास यशस्वीरित्या पार पाडून घ्यायचे आहे. डॉ.नागकुमार कुणचगी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या दिर्घ सेवाकालाचा, अनुभवाचा व शैक्षणिक अर्हतेचा मनपासेवांमध्ये अधिकाधिक उपयोग करुन घेणे जरुरीचे असल्याने व त्यांच्यासारख्या धडाडीच्या कर्तबगार, व हुशार अधिकाऱ्याच्या कार्यक्षम सेवेची पिंचिंमनपास आवश्यकता असल्याने विशेष बाब म्हणून डॉ.नागकुमार राजेंद्र कुणचगी यांना नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त करण्या ऐवजी त्यांना पिंचिंमनपा सेवेत आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर २ वर्षांची मुदत वाढ देणेस व त्याअनुषंगाने शासनाची मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७५ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ११

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/हॉकर्स/१/कावि/ ६१०/०९ दि.१८ .७.०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.११३ दिनांक ११/०८/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६९ दि.२१/१२/२००९

अन्वये

महापालिकेने तयार केलेल्या हॉकर्स धोरण २००७ यास मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ दि.१२/१०/२००७ अन्वये मान्यता मिळालेली आहे तो रद्द करुन महाराष्ट्र शासनाने नव्याने दिलेल्या फेरीवाला व्यवसायाच्या आदर्श उपविधी २००९ नुसार "पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९" मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर :- प्रशासनाकडून माहिती घ्यावी

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, महापालिका सभेने २००७ साली हॉकर्स धोरण मंजूर केलेले होते त्याकरिता लाभार्थ्यांची यादी तयार करणे, समिती स्थापन करणे, ओळखपत्र देणे इ.जून्या धोरणाप्रमाणे सर्वेक्षणाचे काम केलेले आहे. लाभार्थीना ॲडेन्टीफाय करण्याचे काम केलेले आहे. शासनाच्या नियमावलीप्रमाणे आदर्श उपविधी २००९ आहेत त्यास महापालिका सभेची मान्यता घेवून पब्लिश करायचे आहे. त्यात दुरुस्ती करुन शासनाच्या मान्यतेसाठी पाठवायचे आहे. यात फेरीवाला क्षेत्र-१ व फेरीवाला क्षेत्र-२ अशा दोन कॅटेगरी केलेल्या आहेत. स्थिर फेरीवाला म्हणजे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही अशा परिच्छेद ४.१२ मध्ये समाविष्ठ होणार नाहीत असे पदपथावर ही तात्पुरते फेरीवाला क्षेत्र-१ घोषित करता येईल. मात्र जसजसे परिच्छेद ४.२ नुसार स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायासाठी जागा निर्माण होतील तसतसे तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-१ टप्या टप्याने संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. फेरीवाला क्षेत्र-२ मध्ये रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही व ना फेरीवाला क्षेत्रा व्यतिरिक्त रस्त्यांवर फेरीवाला क्षेत्र-२ जाहीर करता येईल, या रस्त्यांवर फिरत्या फेरीवाल्यांनी फिरुन व्यवसाय करण्यास मुभा राहील व कोणत्याही परिस्थितीत त्यांना स्थिर स्वरुपात व्यवसाय करण्यास मज्जाव राहील.

यामध्ये दोन तासासाठी, चार तासासाठी असे केलेले आहे. २ मी.पेक्षा जास्त फुटपाथ असेलतर दोन तासासाठी देता येईल. यासाठी फेरीवाल्यांच्या जागा निश्चित करायच्या आहेत व त्यास महापालिका सभेची मान्यता घेवून शासनाकडे पाठवायचे आहे. खाजगी इमारतींना बांधकाम परवानगी देते वेळेस त्यातील रहिवाशांना सोयीच्या दृष्टिने दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या विक्रीकरिता गाळे बांधणे अनुज्ञेय असेल. तसेच महापालिका क्षेत्रातील जुन्या इमारतीचा पुनर्विकास झोपडपट्टी पुनर्विकास आणि नागरी नूतनीकरण योजना मध्ये नागरीकांच्या सोयीच्या दृष्टिने इमारतीमध्ये दैनंदिन गरजेच्या वस्तूच्या विक्रीकरिता राखीव गाळे बांधणे अनुज्ञेय असेल. २००७ च्या धोरणाप्रमाणे दोन समित्या ठेवलेल्या होत्या. या उपविधीप्रमाणे ज्या समित्या आहेत त्यात महानगरपालिका शहर फेरीवाला समिती, महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती, फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती हया समित्या आहेत नोंदणी करण्याकरिता अर्जासोबत महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे वास्तव्य करीत असल्याबाबतचा दाखला अनिर्वाय आहे. असे यामध्ये नमुद केलेले आहे.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, आता आज विषय महापालिका सभागृहामध्ये येतोय आणि त्याच्या अगोदरच लाभार्थ्यांचा सर्व्हे पण केलेला आहे. वास्तवीक यामध्ये कमिटि सुध्दा आहे. अजून कमिटि ठरवायची आहे त्याप्रमाणे नियोजन करायचे आहे. कमिटिला,सभागृहाला विश्वासात घेतलेले नाही आणि सभासदाची यादी सुध्दा काढलेली आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील जो फेरीवाला आहे त्याचे वास्तव्य १५ वर्षाऐवजी ५ वर्षे करावे सर्व्हे अगोदरच केला असेलतर त्या कमिटिवर आम्ही जे सदस्य आहोत त्याना काहीच काम नाही. माझ्या वॉर्डामध्ये एका-एका माणसाच्या पाच-पाच टप-या आहेत, ज्याच्या टप-या आहेत तो नौकरीला आहे, उदयोगधंद्यावाला आहे, चांगल्या पदावर आहे तरी त्याच्या पाच-पाच टप-या आहेत. खरा लाभार्थी आहे जो स्वत: लाभ घेणार आहे त्याला हे दयावे नाहीतर एक-एक जणाच्या पाच-पाच टप-या आहेत व त्याला पाच-पाच हजार भाडे तो घेतो आहे. संबंधीत नगरसेवकांना बरोबर घेवून सर्व्हे करण्यात यावा तुम्ही केलेला सर्व्हे रद्य करणेत यावा.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, २००७ चे धोरण आहे. महापालिका सभा ज्याप्रमाणे धोरण मान्य करेल त्याप्रमाणे करावे लागेल.

मा.सुजाता नांदगूडे :- मा.महापौर साहेब, स्थानिक नगरसेवकांच्या सुचना लक्षात घेवून हा सर्व्हे पुन्हा करण्यात यावा.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, या प्रश्नासाठी बारा ते तेरा वर्षे आम्ही भांडतो आहोत. आपण नियम करणार आहोत. प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये हॉकर्सझोन येतो का. काही कॉमनस्पेस आहेत, दुर्गादेवी टेकडी, भक्ति-शक्ति उदयान याठिकाणी हॉकर्स झोन करणार आहोत. त्याठिकाणी काय नियम लावणार आहोत. त्यामध्ये अंध,अपंग व महिला बचत गट यांच्यासाठी जागा

रिझर्व्ह ठेवावी. प्राधिकरणामध्ये रेसिडेन्शिअल ऐरिया आहे, त्याठिकाणी सकाळी पाचच्या अगोदर भंगारवाले फिरतात त्यानंतर ते चो-यामध्ये समाविष्ठ असतात असे पोलीसांकडून समजलेले आहे. त्यामुळे आम्ही सांगू ते रस्ते इन्टरनल फेरीवाल्यांसाठी ठेवायला पाहिजेत. जे लोक सकाळी पाच वाजता फिरतात त्यांना परवानगी देवू नका त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. भंगार रोज कोणी विकत नाही. रोजच कोणाच्या घरात भंगार नसते. तसेच यामध्ये स्थानीक नगरसेवकांना सहभागी करुन घ्यावे. पुर्वी काही लोकांना नगरपालिकेनी टप-यासाठी लायसेन्स दिलेले होते. नागरीक असतात दुस-या वॉर्डामधले आणि त्यांची टपरी असते निगडीमध्ये. प्रामुख्याने स्थानीक वॉर्डामधील ज्या लोकांनी मागणी केली आहे त्यांना प्राधान्य दयावे व कॉमनप्लेसमध्ये बाहेरच्या लोकांना प्राधान्य दयावे. हॉकर्सझोन हे रेसिडेन्शिअल ऐरियाच्या बाहेर असेलतर त्यामुळे नागरीकांची असुविधा होऊ नये.

मा.महापौर :- धोरण वाचून घ्यावे, उपसूचना लेखी द्याव्यात. निर्णयासाठी परत विषय येणार आहे.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, यशवंत भोसले म्हणाले लोक भाडयाने टप-या देतात. भाडयाने टप-या द्यायला नाही पाहिजेत. जे गरजु आहेत त्यांना टपरी मिळाली पाहिजे. EWS चे घर देताना आपण बघितले दुसरे घर आहे का नाही. तशी टपरी देतांना त्या माणसाची पुर्ण चौकशी केली पाहिजे. त्याची स्वत:ची दुसरी टपरी आहे का नाही हे पाहिले पाहिजे.

मा.महापौर :- लेखीस्वरुपात सूचना द्या.

मा.सुलभा ऊबाळे :- फिश मार्केट, मटण मार्केट असे काही रिझर्वेशन ठेवले आहे का?

मा.पाटिल (उपसंचालक,नगररचना) :- मा.महापौर साहेब, नवीन हॉकर्स समाविष्ट होतील अशा प्रकारे प्लॅनिंग करणार आहोत त्यासाठी नियम बदलावे लागतील.

मा.सुलभा ऊबाळे :- महापौरांनी या सर्व गोष्टी लेखी स्वरुपात घ्याव्यात.

मा.महापौर :- जाहीरात पेपरमध्ये येणार आहे.

मा.आर.एस.कुमार :- फेरीवाल्यांमध्ये टपरीवाले येतात का?

मा.पाटिल (उपसंचालक,नगररचना) :- मनपाकडून वर्गवारी केलेले टपरीवाले यात येतात. तात्पुरते आणि पर्मनन्ट असे टपरीवाले येतात.

मा.आर.एस.कुमार :- शहरात ५ ते १० हजार टपऱ्यावाले आहेत, त्यांना हे नियम लागू होणार आहेत का?

मा.पाटिल (उपसंचालक,नगररचना) :- नियम करणार आहोत, त्यात जे लोक बसतील व उपलब्ध असणारी टपऱ्यांची संख्या याप्रमाणे रिमॉडीफाय करुन टपरीधारक ठरवणार आहोत.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, फेरीवाल्यांना आपण टॅक्स लावणार आहात का. आणि भाडे कसे घेणार आहात हे सांगावे. पिंपरी चिंचवडमध्ये सात-आठ हजार फेरीवाले असे म्हणलेले आहे, खरोखरच एवढे आहेत का. त्यांच्या निश्चिततेबाबत शंका येते. महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असे कशामुळे करायचे आहे. पिंपरी चिंचवड शहरात किमान १० वर्षे राहणारा असे करायला पाहिजे. महाराष्ट्र राज्याचा म्हणलेतर पिंपरी चिंचवड शहर हातगाडीवाल्याचे होईल. सध्या जे आहेत त्यांचे समाधान करावे. अंध,अपंग लोकांबरोबर आपण मतीमंद लोकांना दयावे. या लोकांना ओळखपत्र देणार आहात का, हातगाडीवर फोटो लावला पाहिजे.

मा.महापौर :- विषयाबाबत अभ्यास करुन या म्हणून सांगीतलेले होते. कमिटि गठीत करणार आहोत. त्यामध्ये त्या भागातील प्रभाग समिती अध्यक्ष, त्या प्रभागातील सर्व नगरसेवक, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस निरिक्षक वाहतूक, वैद्यकीय अधिकारी-ज्येष्ठ रुग्णालय वैद्यकीय अधिकारी, अतिक्रमण अधिकारी-प्रभाग कार्यकारी अभियंता, उपअभियंता स्थापत्य, नगररचना अधिकारी, स्थानिक पातळीवरील फेरीवाला संघटनेचे ४ प्रतिनिधी (पैकी २ महिला ) व प्रभाग अधिकारी हे लोक कमिटी मध्ये असतील. आपण मंजूरी द्यायची आहे. सर्व नगरसेवक यामध्ये आहेत व दोन महिन्याचा अवधी आहे.

मा.सावंत :- मा.महापौर साहेब, मा.महापालिका सभा ठराव क्र. १८७ दि.

(सहा.आयुक्त)

१२.१०.२००७ अन्वये मान्यता मिळाली आहे. महापालिकेनी निश्चित केलेल्या चार प्रभागामध्ये हॉकर्स झोन करायचे आहेत. त्या अनुषंगाने वेळोवेळी सभा झाल्या आहेत, जागा फिक्स झाल्या आहेत सर्व्हे झाला आहे आजचा जो विषय आलेला आहे तो म्हणजे शासनाने ठरविले आहे की सगळया महापालिकांसाठी आदर्श उपविधी करायचा, तो उपविधी आपल्यासमोर आलेला आहे त्यास महापालिका सभेनी मान्यता दिल्यानंतर त्याला प्रसिध्दी दिल्यानंतर सन्मा.सदस्यांना ऑब्जेक्शन घेण्याचे अधिकार राहतील त्याच्यानंतर संबंधीत विभाग अभ्यास करुन पुन्हा सुधारणासहित विषय आपल्यासमोर मान्यतेसाठी

ठेवणार आहे त्याच्यानंतर पुढील कामकाज चालू राहणार आहे. मान्यता दिल्यानंतर हे नियम मंजूर होतील. नियम प्रसिध्द करणारा विभाग आहे त्यांच्याकडे सूचना देता येतील त्यावर त्यांनी निर्णय घ्यायचा आहे व पुन्हा महापालिका सभेपुढे विषय येणार आहे. आपल्याला पुर्ण संधी मिळणार आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

पिंचिंमनपामध्ये हॉकर्स धोरणामध्ये, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेचा १५ वर्षाचा पुरावा तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील १० वर्षे वास्तव्याचा पुरावा ग्राह्य असेल; अधुनिक पध्दतीचे ओळखपत्र त्यामध्ये फोटोसह अंगठ्याचा ठसा (Biometric Technology) बंधनकारक असेल; अंध, अपंग, मतिमंद व महिला बचत गटांना प्राधान्य; या बाबींचा उल्लेख करणेची दुरुस्ती करुन त्या दुरुस्तीसह मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या, मंजूर विकास आराखड्यातील ताब्यात आलेल्या पण अद्यापर्यंत विकसित न झालेल्या खालील आरक्षित जागा मनपाची सध्याची आर्थिक परिस्थितीचा विचार करता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करणेचे धोरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | प्रयोजन | क्षेत्र | सि.स.नं. |
|---|---|---|---|---|
| १ | संत तुकारामनगर आ.क्र.५३ | वाहनतळ, बस टर्मिनस व व्यापारी केंद्र | ८००० चौ.मी. | ४८५८/२ पै. |
| २ | आ.क्र.४३८अ | भोसरी नाट्यगृह चालविणेस देणे | ४३०० चौ.मी. | सर्व्हे नं.१ |
| ३ | भोसरी आ.क्र.४३१ | मॅटर्निटी होम, डिस्पेंन्सरी, वाचनालय व मनपा वापरासाठी | ४००० चौ.मी. | सर्व्हे नं.१ |
| ४ | आ.क्र.२८८ | सांस्कृतिक भवन | ५०१५ चौ.मी. | ४८८५ पै. |

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसुचनेस अनुमोदन देतो.
मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडते-
महिला व बालकल्याण योजने अंतर्गत घटक योजना क्रमांक- ८ चा लाभ जास्तीत जास्त महिला बचतगटांना मिळावा याकरिता राष्ट्रीयकृत बँकांबरोबरच पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत बचतगट अथवा बचतगट महासंघास व्यवसायासाठी कर्ज मंजूर झाल्यास त्याकरिताही नियमानुसार अनुदान संबंधितांना देण्यास मान्यता देणेत यावी.
मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.
मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, हॉकर्स धोरण २००७ संदर्भात अ-प्रभागातील सदस्यांनी ज्यावेळेला विषय आणला त्यावेळेला मा.आयुक्त साहेबांनी हॉकर्स धोरण २००७ प्रमाणे विषय केला व जागा निश्चित केली. हॉकर्स झोन, नो हॉकर्स झोन असे केले. आता पुन्हा आदर्श उपविधी २००९ हा शासनाच्या

माध्यमातून नगरपालिका,महापालिकेला लागू करतो आहोत. फेब्रूवारी २००७ ला महापालिकेची निवडणूक झाली त्यानंतर काही महिन्यामध्येच हॉकर्स धोरण राबविण्यात यावे अशी भूमीका घेवून ते मंजूर केले आहे. आता कुठेतरी हे धोरण आपल्याकडे राबविले जाण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. लगेच २००९ उपविधी आणतो आहोत यामध्ये तोच सर्व्हे ग्राहय धरला पाहिजे तरच हे काम लवकरात लवकर होणार आहे. पुर्वीच्या धोरणामध्ये आपण साहित्य जप्त करायचो अशी पनीशमेंट होती व यामध्ये जी पनीशमेंट आहे ती खुपच मोठी आहे. सहा महिने पर्यंत कैद आणि पाच हजार दंड आहे, तो दंड कमी करावा. सर्वसामान्य लोक आहेत त्यामुळे त्यामध्ये सुट द्यावी. एवढे कठोर शासन त्या लोकांना नसायला पाहिजे. यामध्ये अंध,अपंग,गटई कामगार,विधवा महिला आहेत.

मा.महापौर :- भापकर साहेब, तुम्हांला जे म्हणायचे आहे ते लेखी स्वरुपात द्यावे तुमची उपसूचना स्विकारतो.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, तुम्ही शब्द दिल्यानंतर तो पाळला पाहिजे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.मंगलाताई कदम व मा.अपर्णा डोके यांची,मा.काळूराम पवार व मा.जगदीश शेट्टी यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-७९५ विषय क्रमांक :- ११

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/हॉकर्स/१/कावि/ ६१०/०९ दि.१८ .७.०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.११३ दिनांक ११/०८/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७६९ दि.२१/१२/२००९

अन्वये

महापालिकेने तयार केलेल्या हॉकर्स धोरण २००७ यास मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ दि.१२/१०/२००७ अन्वये मान्यता मिळालेली आहे तो रद्द करुन महाराष्ट्र शासनाने नव्याने दिलेल्या फेरीवाला व्यवसायाच्या आदर्श उपविधी २००९ नुसार "पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९" मसुद्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी करणेत आली आहे त्यास त्यामध्ये पिंचिंमनपामध्ये हॉकर्स धोरणामध्ये, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेचा १५ वर्षाचा पुरावा तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील १० वर्षे वास्तव्याचा पुरावा ग्राह्य असेल; अधुनिक पध्दतीचे ओळखपत्र त्यामध्ये फोटोसह अंगठ्याचा ठसा (Biometric Technology) बंधनकारक असेल; अंध, अपंग, मतिमंद व महिला बचत गटांना प्राधान्य; या बाबींचा उल्लेख

करणेची दुरुस्ती करुन त्या दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या, मंजूर विकास आराखड्यातील ताब्यात आलेल्या पण अद्यापर्यंत विकसित न झालेल्या खालील आरक्षित जागा मनपाची सध्याची आर्थिक परिस्थितीचा विचार करता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करणेचे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | प्रयोजन | क्षेत्र | सि.स.नं. |
|---|---|---|---|---|
| १ | संत तुकारामनगर आ.क्र.५३ | वाहनतळ, बस टर्मिनस व व्यापारी केंद्र | ८००० चौ.मी. | ४८५८/२ पै. |
| २ | आ.क्र.४३८अ | भोसरी नाट्यगृह चालविणेस देणे | ४३०० चौ.मी. | सर्व्हे नं.१ |
| ३ | भोसरी आ.क्र.४३१ | मॅटर्निटी होम, डिस्पेंन्सरी, वाचनालय व मनपा वापरासाठी | ४००० चौ.मी. | सर्व्हे नं.१ |
| ४ | आ.क्र.२८८ | सांस्कृतिक भवन | ५०१५ चौ.मी. | ४८८५ पै. |

महिला व बालकल्याण योजने अंतर्गत घटक योजना क्रमांक- ८ चा लाभ जास्तीत जास्त महिला बचतगटांना मिळावा याकरिता राष्ट्रीयकृत बँकांबरोबरच पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत बचतगट अथवा बचतगट महासंघास व्यवसायासाठी कर्ज मंजूर झाल्यास त्याकरिताही नियमानुसार अनुदान संबंधितांना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७९६ विषय क्रमांक :- १२

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१३०९ /०९ दि.११.११.०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२३२ दिनांक १/१/२०१०

श्री.पाटील शशिकांत रामदास यांना प्राचार्य पदावर पे बँड १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० मध्ये नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७९७ विषय क्रमांक :- १३

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.जकात/१०/कावि/३७७ /०९ दि.८.१२.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२३५ दिनांक १/१/२०१०

प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण २००९ प्रमाणे जकात नियम २००१ चे अनुसूची २ मध्ये तरतुद करणेस व यास नागरिकांच्या हरकत / सूचना मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १४

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.नरवि/कावि/५/३१/०९ दि.१६.१२.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२३९ दिनांक १/१/२०१०

म.प्रा.व नि.न.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ए ए) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसारचा मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.१४ वाहनतळाबाबतच्या नियमातील टेबल क्र.६ मधील फेरबदलाच्या प्रस्तावाकामी शासनाने केलेले फेरबदल व मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल याचा तुलनात्मक विचार करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल अधिक उचित वाटत असल्यामुळे शासनाने केलेल्या फेरबदलाच्या अनुषंगाने फेरबदल न करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेल्या फेरबदलचा कलम ३७ च्या ठरावास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, नियमावलीचा विषय आहे, सध्या रस्त्याच्या साईडला वाहने पार्किंग केली जातात त्यासंदर्भात दर ठरवून दिलेले आहेत परंतू त्याहीपेक्षा जास्त दर घेतात याची माहिती द्यावी.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, विषयाचे डॉकेट वाचण्यात यावे समन्वय समिती कोणाची आहे व त्यामध्ये कोण कोण आहेत याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

मा.पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, मु.प्रा. व नि. न. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१)(ए ए) अन्वये मुंबईमध्ये आहे त्या धर्तीवर करायचे आहे, शासनाने सुध्दा तसे केलेले आहे त्याप्रमाणे आपल्याकडे विषय आलेला आहे. मा.आयुक्त,बिल्डींग परमिशनचे अधिकारी, आर्किटेक्ट, बिल्डर्स यांनी पुण्याच्या धर्तीवर पार्किंगसाठी सोडावयाच्या जागेमध्ये वाढ करण्याचे सुचविलेले होते त्या धर्तीवर आपल्याकडे असावे असा प्रस्ताव आलेला होता त्यामध्ये आपण शासनाने केलेले बदल आणि पुण्याच्या धर्तीवर करायचे यामध्ये कमप्यारिजन केलेली आहे शासनाने जे केलेले आहे ते मुंबईला लागू आहे. मुळ नियमावलीमध्ये आपण वाढ केलेली आहे. जे बदल आहेत त्याचा प्रस्ताव महापालिका सभेसमोर ठेवलेला आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, शहरामध्ये वाढणा-या गाडयांच्या संखेचा विचार करता वाढविलेल्या पार्किंगच्या जागेचा प्रस्ताव चांगला आहे तो मंजूर करणेत यावा. आपण सर्वसाधारण सभेमध्ये रस्त्यावर नो-पार्किंग झोनमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर दंडाचा विषय मंजूर केलेला आहे त्याचा खुलासा करावा.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, विषयाला मंजूरी देण्यास हरकत नाही. नो-पार्किंग झोनच्या विषयाला मंजूरी दिली त्यावेळेला सांगीतले होते की अगोदर पार्किंगच्या जागा ताब्यात आल्या पाहिजेत,तशाप्रकारची व्यवस्था करण्याची योजना राबविली पाहिजे नंतर अशाप्रकारचे अधिकार पोलीसांना दिले पाहिजेत. परंतू तसे न करता आपण पोलीसांना अधिकार दिल्यामुळे ते अतीशय चुकिच्या पध्दतीने आपले अधिकार वापरतात. त्यामध्ये अनेक नगरसेवकांना सुध्दा अनुभव आलेला आहे. पार्किंगमध्ये व्यापारी गाळे, हॉटेल, दुकाने चालू आहेत. त्या जागा मोकळया कराव्यात त्यामुळे लोक रस्त्यावर वाहने उभी करतात. या विषयाला मंजूरी दयावी परंतू पार्किंगच्या संदर्भातील प्रश्न आहे त्याबद्यल ठोस भूमीका घ्यावी आणि तशाप्रकारचे आदेश द्यावेत. पार्किंगच्या जागेत व्यावसायीकांना,व्यापा-यांना, हॉटेल व्यावसायीकांना कधी परवानगी दिलेली आहे व त्या संदर्भात प्रशासन काय कार्यवाही करते याची भूमिका स्पष्ट करण्यात यावी.

मा.महापौर :- आपण सर्वानी मिळून पार्किंगच्या संदर्भात विषयाला मंजूरी दिलेली आहे, जे जाचक आहे ते तूमच्या वतीने तसे अधिकार मला दिलेतर त्याप्रमाणे आयुक्तांशी बोलून दंड कमी करु.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, जीबी मध्ये विषय मंजूर केला आहे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी चालू झाली आहे. त्यामध्ये फरक झालेला आहे, आपण कमर्शिअल गाडयांना दंड आकारावा असे केलेले होते परंतू याठिकाणी सरसकट दंड आकारला जातो. टू व्हिलरलाही दंड आकारला जातो. तरी आपण तसा स्थायी समितीमध्ये ठराव पास करुन घ्यावा. एक-एक हजार रुपये दंड आकारला जातो. ज्या ज्याठिकाणी पार्किंग झोन करणे आवश्यक आहे त्या त्या ठिकाणी पार्किंग झोन करावेत परंतू ज्या ठिकाणी बँक आहे,हॉटेल आहे तेथे नागरीकांचे काम असते त्याठिकाणी नो-पार्किंगचे बोर्ड लागलेले आहेत. तूमच्या वॉर्डामध्ये हॉटेल कलासागर आहे त्याठिकाणीच बाजूला बँक आहे तेथे नो-पार्किंगचा बोर्ड लागलेला आहे त्याठिकाणी रहदारी नसते. म्हणजे जेथे दंड वसूल करता येतो तेथे नो-पार्किंग केलेले आहे ही पध्दत चुकिची आहे याकडे लक्ष दिले पाहिजे. ज्या ज्याठिकाणी आवश्यकता आहे त्या त्या ठिकाणी पार्किंग उपलब्ध करुन दिले पाहिजे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पुणे मुंबई महामार्गावर निगडी ते दापोडी याठिकाणी नो- पार्किंग झोन मध्ये पार्क केलेल्या गाड्यावर कारवाई करण्याचे अधिकार वाहतुक पोलिस यांना न देता त्या अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांना देण्यात यावेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, शहराच्या वाढत्या भौगोलीक दृष्टिने अत्यंत महत्वाचा विषय आहे. आझमभाई पानसरे यांनी मुद्या मांडला तो बरोबर आहे. ज्याठिकाणी लोकांना जायचे असते त्याठिकाणी नो-पार्किंगचा बोर्ड लावला जातो. त्याठिकाणी आपल्याला ग्राहक मिळतील अशा रितीने बोर्ड लावलेले आहेत. आपण पुणे पॅटर्न म्हणतो आपण पिंपरी चिंचवड पॅटर्न भौगोलीकदृष्टया का तयार करु शकत नाहीत, कमिटि का तयार करु शकत नाहीत. पुण्याचा पॅटर्न पिंपरी चिंचवड शहराला जोडतो आहोत. पिंपरी चिंचवड शहरात ग्रामीण भाग आहे. यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व अधिकार पोलीसाना दिलेले आहेत. झोन बनवित असताना एक कमिटि तयार करावी आणि त्यावर प्रत्येक प्रभागातील प्रभाग अध्यक्ष असावेत. नो-पार्किंग झोन तयार करायचे त्यावर नगरसदस्य किंवा प्रभाग अध्यक्ष असायला पाहिजेत. पोलीस त्यांच्या मनाप्रमाणे तयार करतात ती कमिटि महापौरांच्या अध्यक्षतेखाली असावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७९८ विषय क्रमांक :- १४

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.नरवि/कावि/५/३१/०९ दि.१६.१२.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२३९ दिनांक १/१/२०१०

म.प्रा.व नि.न.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ए ए) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसारचा मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.१४ वाहनतळाबाबतच्या नियमातील टेबल क्र.६ मधील फेरबदलाच्या प्रस्तावाकामी शासनाने केलेले फेरबदल व मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल याचा तुलनात्मक विचार करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल अधिक उचित वाटत असल्यामुळे शासनाने केलेल्या फेरबदलाच्या अनुषंगाने फेरबदल न करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेल्या फेरबदलचा कलम ३७ च्या ठरावास मान्यता देणेत येत आहे. पुणे मुंबई महामार्गावर निगडी ते दापोडी याठिकाणी नो- पार्किंग झोन मध्ये पार्क केलेल्या गाड्यावर कारवाई करण्याचे अधिकार वाहतुक पोलिस यांना न देता त्या अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार मा.स्थायी समिती यांना देण्यात येत आहेत.

अनुकूल-७५ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १५

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.माध्य/शि/१/कावि/८९८/०९ दि.२३.१२.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४२ दिनांक १/१/२०१०

निवड यादीतील श्री.मुल्ला अकबर महंमद यांस मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने नेमणुक देणेस तसेच सन २०१० मध्ये मुख्याध्यापक रिक्त होणा-या पदावर प्रतिक्षा यादीतील श्री वारवारे श्रीपती हरी यांस आवश्यकतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य विभागातील सेवाजेष्ठ पदवीधर उपअभियंता श्री.प्रविण

विठ्ठल लडकत यांना रिक्त झालेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.
मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.
मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिका आस्थापनेवर कामगार कल्याण अधिकारी या अभिनामाचे एकमेव पद सुधारित पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणी मध्ये शासन मंजूर असून सद्यःस्थिती मध्ये ते पद रिक्त आहे. सदर पदावर पदोन्नतीने नेमणूक करणे करीता १) वरिष्ठ लिपिक, नायब तहसिलदार या पदा बरोबरच समाजसेवक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावरील कर्मचाऱ्यांस पदोन्नती देण्यात यावी. २) कामगार कल्याण अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे अर्हता निश्चित करण्यात यावी. a.सांवधिक विद्यापीठाकडील विधी शाखेची तृतीय वर्षासह पदवी उत्तीर्ण, b. सांवधिक विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.एस.डब्ल्यू.) उत्तीर्ण, c. एल.एस.जी.डी./एल.जी.एस.पदवीका उत्तीर्ण, d. महापालिकेच्या कामगार कल्याण विभागाकडील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य, याप्रमाणे अर्हता निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी.
मा.हरिभाऊ तिकोणे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.
मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.प्रशांत शितोळे व मा. हरिभाऊ तिकोणे यांची,मा.आर.एस.कुमार व मा.मारुती भापकर यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७९९ विषय क्रमांक :- १५

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/१/कावि/८९८/०९ दि.२३.१२.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४२ दिनांक १/१/२०१०

निवड यादीतील श्री.मुल्ला अकबर महंमद यांस मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने नेमणुक देणेस तसेच सन २०१० मध्ये मुख्याध्यापक रिक्त होणा-या पदावर प्रतिक्षा यादीतील श्री वारवारे श्रीपती हरी यांस आवश्यकतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य विभागातील सेवाजेष्ठ पदवीधर उपअभियंता श्री.प्रविण विठ्ठल लडकत यांना रिक्त झालेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिका आस्थापनेवर कामगार कल्याण अधिकारी या अभिनामाचे एकमेव पद सुधारित पे बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणी मध्ये शासन मंजूर असून सद्यःस्थिती मध्ये ते पद रिक्त आहे. सदर पदावर पदोन्नतीने नेमणूक करणे करीता १) वरिष्ठ लिपिक, नायब तहसिलदार या पदा बरोबरच

समाजसेवक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, सहाय्यक समाज विकास अधिकारी या पदावरील कर्मचाऱ्यांस पदोन्नती देण्यात यावी. २) कामगार कल्याण अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे अर्हता निश्चित करण्यात यावी. a.सांवधिक विद्यापीठाकडील विधी शाखेची तृतीय वर्षासह पदवी उत्तीर्ण, b. सांवधिक विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.एस.डब्ल्यू.) उत्तीर्ण, c. एल.एस.जी.डी./एल.जी.एस.पदवीका उत्तीर्ण, d. महापालिकेच्या कामगार कल्याण विभागाकडील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य, याप्रमाणे अर्हता निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-८०० विषय क्रमांक :- १६

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. विधी समिती

दि.०४/१२/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-८०१ विषय क्रमांक :- १७

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. महिला व बालकल्याण समिती

दि.११/११/०९, १६/११/०९ व १९/११/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-८०२ विषय क्रमांक :- १८

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. क्रिडा समिती

दि.२१/१०/०९, ४/११/०९ व १८/११/०९ [दु.३:४५ व ४:१५] चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १९

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर व मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर यांचा दि.२/१२/२००९ चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३२५ दि.२/१२/२००९

दिघी येथील स.नं.२ व ३ मधील संरक्षण हद्दीस लागून विकास योजनेत १५.० मी. रस्ता दर्शविण्यात आला आहे. तथापि सदर रस्त्यामुळे माजी सैनिकांची घरे बाधीत होत आहे. परंतु सदर रस्ता हा अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित केल्यास सैनिकांची घरे वाचतील सबब विकास योजनेतील १५.० मी. रस्त्याची आखणीत फेरबदल करुन अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भागशः मंजुर विकास योजनेतील मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं.६६ पै., ६३, ६२ पै यामधील आ.क्र.२।४३ उंच पाण्याची टाकी या प्रस्तावाने बाधित होणाऱ्या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(२) व भूसंपादन कायदा १८९४ तरतुदीतील तातडीचे कलमासह भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणाऱ्या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार मौजे पिंपरी, ता.हवेली, जि.पुणे येथील सिटी स.नं.१९८२ (वैष्णादेवी मंदिर, पिंपरी समोरील भाग) संत कंवरराम मंडलिक, शंकर भगवान मंदिर ते ज्ञानीजी गुरुद्वारा समोरील भागात आहे. आरक्षण क्र.१४५-१४६-१४७ नुसार अनुक्रमे सिव्हील व कलचरल स्टेट, स्लम साइट टु बी रीओकेटेड साठी आरक्षित आहे. सदर आरक्षणामध्ये इ.स.१९५५ पासून येथे नागरिक राहत असून सदर नागरिकांनी तिथे स्वतःचे पक्के घरे बांधून घेतलेले आहे. तरी सदरील योजनेनुसार सिटी स.नं.१९८२ वर आरक्षण ठेवणे जरुरीचे नसून तेथेच रहिवासी झोन म्हणून घोषित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदल करणेकामी व त्यास शासनाची मान्यता घेणेकामी सर्व कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- ब प्रभागांर्तगत केशवनगर ते काळेवाडी पुलापर्यंत रस्त्यामध्ये येणाऱ्या जलवाहिण्या हलविणे या कामाचे ठिकाणी रस्त्याचे सिमांकनानुसार व रस्त्याचे काटछेदानुसार पाईपलाईन टाकणेसाठी जागा उपलब्ध नसलेने सदरचे कामामधून वार्ड क्र.६४ चिंचवड गावातील पाईपलाईन डिझाईननुसार बदलून घेणेसाठी साईट बदलास change of site मान्यता देणेत यावी.

प्रभाग क्र.२७, नवीन क्र.३२ संत तुकारामनगर येथील आरक्षण क्र.५५ मध्ये विरंगुळा केंद्र बांधणेचे काम निविदा क्र.१०५/७-२००५/०६ अन्वये चालू असून सदर काम पूर्ण करण्याकरीता तरतूद उपलब्ध असून याकामीचे र.रु.७०,००,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.जितेंद्र ननावरे व मा.भाऊसाहेब सुपे यांची, मा.आर.एस.कुमार व मा.प्रशांत शितोळे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-८०३ विषय क्रमांक :- १९

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर व मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर यांचा दि.२/१२/२००९ चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३२५ दि.२/१२/२००९

दिघी येथील स.नं.२ व ३ मधील संरक्षण हद्दीस लागून विकास योजनेत १५.० मी. रस्ता दर्शविण्यात आला आहे. तथापि सदर रस्त्यामुळे माजी सैनिकांची घरे बाधीत होत आहे. परंतु सदर रस्ता हा अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित केल्यास सैनिकांची घरे वाचतील सबब विकास योजनेतील १५.० मी. रस्त्याची आखणीत फेरबदल करुन अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भागशः मंजुर विकास योजनेतील मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं.६६ पै., ६३, ६२ पै यामधील आ.क्र.२।४३ उंच पाण्याची टाकी या प्रस्तावाने बाधित होणाऱ्या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(२) व भूसंपादन कायदा १८९४ तरतुदीतील तातडीचे कलमासह भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणाऱ्या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेनुसार मौजे पिंपरी, ता.हवेली, जि.पुणे येथील सिटी स.नं.१९८२ (वैष्णादेवी मंदिर, पिंपरी समोरील भाग) संत कंवरराम मंडलिक, शंकर भगवान मंदिर ते ज्ञानीजी गुरुद्वारा समोरील भागात आहे. आरक्षण क्र.१४५-१४६-१४७ नुसार अनुक्रमे सिव्हील व कलचरल स्टेट, स्लम साइट टु बी रीओकेटेड साठी आरक्षित आहे. सदर आरक्षणामध्ये इ.स.१९५५ पासून येथे नागरिक राहत असून सदर नागरिकांनी तिथे स्वतःचे पक्के घरे बांधून घेतलेले आहे. तरी सदरील योजनेनुसार सिटी स.नं.१९८२ वर आरक्षण ठेवणे जरुरीचे नसून तेथेच रहिवासी झोन म्हणून घोषित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदल करणेकामी व त्यास शासनाची मान्यता घेणेकामी सर्व कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे. ब प्रभागांर्तगत केशवनगर ते काळेवाडी पुलापर्यंत रस्त्यामध्ये येणाऱ्या जलवाहिण्या हलविणे या कामाचे ठिकाणी रस्त्याचे सिमांकनानुसार व रस्त्याचे काटछेदानुसार पाईपलाईन टाकणेसाठी जागा उपलब्ध नसलेने सदरचे कामामधून वार्ड क्र.६४ चिंचवड गावातील पाईपलाईन डिझाईननुसार बदलून घेणेसाठी साईट बदलास change of site मान्यता देणेत येत आहे.

प्रभाग क्र.२७, नवीन क्र.३२ संत तुकारामनगर येथील आरक्षण क्र.५५ मध्ये विरंगुळा केंद्र बांधणेचे काम निविदा क्र.१०५/७-२००५/०६ अन्वये चालू

असून सदर काम पूर्ण करण्याकरीता तरतूद उपलब्ध असून याकामीचे र.रु.७०,००,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २०

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ व मा.आल्हाट शांता महेंद्र यांचा दि.२/१२/२००९ चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३२६ दि.२/१२/२००९

विषय :- वॉर्ड क्र.१०५ बोपखेल येथील स.नं.१ व ५ मधील विकास आराखड्यातील प्रस्तावीत २४.०० मीटर रस्त्याची रुंदी कमी करुन ती १८.०० मीटर करणेबाबत.

स.नं.१, २ व ५ मध्ये मंजूर विकास योजनेप्रमाणे २४.०० मी. रस्ता प्रस्तावीत आहे. हा रस्ता अस्तित्वातील स्मशानभुमीवरुन प्रस्ताविल्याने स्मशानभुमीसाठी जागा शिल्लक राहत नाही. या रस्त्याच्या जागेपुढे व मागे १८.०० मी. रस्ता प्रस्तावीत असल्याने या ठिकाणी मध्येच २४.०० मी.रस्ता करण्याची आवश्यकता नाही. तरी किमान घरे बाधीत होतील व स्मशानभुमी राहील अशा प्रकारे रस्ता आखणी करुन विकास योजनेत म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही ठेवुन नागरीकांच्या हरकती व सुचना न आल्यास प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विजया सुतार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-

मौजे काळेवाडी, रहाटणी, थेरगांव, वाकड या परिसरामध्ये मुस्लीम समाज दफनभुमीसाठी काळेवाडी येथिल एम.एम. शाळेच्या मागील बाजुस प्राधिकरणामध्ये जागा उपलब्ध आहे महानगरपालिकेने त्या जागेचे भूसंपादन करुन सदर जागेमध्ये मुस्लीम समाजासाठी दफनभुमी करणेस मान्यता देणेत यावी.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८०४ विषय क्रमांक :- २०

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ व मा.आल्हाट शांता महेंद्र यांचा दि.२/१२/२००९ चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१३२६ दि.२/१२/२००९

विषय :- वॉर्ड क्र.१०५ बोपखेल येथील स.नं.१ व ५ मधील विकास आराखड्यातील प्रस्तावीत २४.०० मीटर रस्त्याची रुंदी कमी करुन ती १८.०० मीटर करणेबाबत.

स.नं.१, २ व ५ मध्ये मंजूर विकास योजनेप्रमाणे २४.०० मी. रस्ता प्रस्तावीत आहे. हा रस्ता अस्तित्वातील स्मशानभुमीवरुन प्रस्ताविल्याने स्मशानभुमीसाठी जागा शिल्लक राहत नाही. या रस्त्याच्या जागेपुढे व मागे १८.०० मी. रस्ता प्रस्तावीत असल्याने या ठिकाणी मध्येच २४.०० मी.रस्ता करण्याची आवश्यकता नाही. तरी किमान घरे बाधीत होतील व स्मशानभुमी राहील अशा प्रकारे रस्ता आखणी करुन विकास योजनेत म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही ठेवुन नागरीकांच्या हरकती व सुचना न आल्यास प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे काळेवाडी, रहाटणी, थेरगांव, वाकड या परिसरामध्ये मुस्लीम समाज दफनभुमीसाठी काळेवाडी येथिल एम.एम. शाळेच्या मागील बाजुस प्राधिकरणामध्ये जागा उपलब्ध आहे महानगरपालिकेने त्या जागेचे भूसंपादन करुन सदर जागेमध्ये मुस्लीम समाजासाठी दफनभुमी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २१

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.क्रीडा/३/कावि/२५/२०१० दि.१६/०१/२०१०

मा.महापालिका सभा ठराव क्र.६३७ दिनांक-०३/०६/२००९ अन्वये कु.कार्तिकी गायकवाड, हिला र.रु.१,००,०००/- अर्थसहाय्य करणेस व सदर अर्थ सहाय्य करणेकामी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यास, शासनाच्या उमेद मान्यतेवर अर्थ सहाय्य करुन, शासनाची कार्योत्तर मान्यता घेणेस मान्यता दिलेली आहे. परंतू मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ८८ (आय) मध्ये ज्यासाठी नगरपालिका निधीचे उपयोजना करावयाचे ते प्रयोजन यामध्ये सार्व.संस्थाना दिलेली अंशदाने अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडील **Cercular No.GEN/1082/1622/CR-126/UD-21, Mantralaya, Bombay 400032 Dt.3rd January 1983** मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ८८ (आय) नुसार महानगरपालिकेने सार्व.संस्थाना त्यांच्या मर्यादेत अनुदान अदा करावे, असे नमूद केलेले आहे. कृष्णाई संगीत विद्यालय, श्री क्षेत्र आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे यांनी दिनांक- १३/११/२००९ च्या अर्जान्वये, कृष्णाई संगीत विद्यालय ही सामाजिक संगीत क्षेत्रातील संगीत शिकविणारी प्रख्यात संस्था आहे. या संस्थेमध्ये अनेक विद्यार्थी संगीत शिक्षण घेत आहेत. या संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शास्त्रीय संगीत शिक्षणासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याने, अनुदान र.रु.१,००,०००/- मिळणेकामी विनंती केलेली आहे. सबब, कृष्णाई संगीत विद्यालय, श्री क्षेत्र आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे ही सामाजिक संगीत क्षेत्रातील संगीत शिकविणारी प्रख्यात संस्था असून, या संस्थेमध्ये अनेक विद्यार्थी संगीत शिक्षण घेत आहेत. या संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शास्त्रीय संगीत शिक्षणासाठी मदतीची आवश्यकता असल्याने, या संस्थेची प्रत्यक्ष पाहणी करुन, संस्थेची घटना नियमावली, अटी शर्ती, ऑडिट रिपोर्ट या कागदपत्राची अट शिथिल करुन कृष्णाई संगीत विद्यालय, पुणे यांना अनुदान र.रु.१,००,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विजया सुतार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.
मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- मे.मोकळ फिल्म प्रा. लिमिटेड व कलारंग सांस्कृतिक कला संस्था पिंपरी चिंचवड हे विविध क्षेत्रामध्ये कामगिरी करित असून लघुपट निर्मितीमध्ये उल्लेखनिय कामगिरी श्री.प्रविण मोकळ करित असून राज्यस्तरीय व आंतर राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी झाला असून आता त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावयाचा असून त्याकरिता त्यांना पुढील येणारे खर्चाकरिता महापालिकेतर्फे

रक्कम रुपये १,००,०००/- अनुदान म्हणून पिंपरी चिंचवड परिसरातील कलारंग सांस्कृतिक कला संस्था पिंपरी चिंचवड यांना देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-८०५ विषय क्रमांक :- २१

दिनांक :- १९.१.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.क्रीडा/३/कावि/२५/२०१० दि.१६/०१/२०१०

मा.महापालिका सभा ठराव क्र.६३७ दिनांक-०३/०६/२००९ अन्वये कु.कार्तिकी गायकवाड, हिला र.रु.१,००,०००/- अर्थसहाय्य करणेस व सदर अर्थ सहाय्य करणेकामी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यास, शासनाच्या उमेद मान्यतेवर अर्थ सहाय्य करुन, शासनाची कार्योत्तर मान्यता घेणेस मान्यता दिलेली आहे. परंतू मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ८८ (आय) मध्ये ज्यासाठी नगरपालिका निधीचे उपयोजना करावयाचे ते प्रयोजन यामध्ये सार्व.संस्थाना दिलेली अंशदाने अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडील **Cercular No.GEN/1082/1622/CR-126/UD-21, Mantralaya, Bombay 400032 Dt.3rd January 1983** मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ८८ (आय) नुसार महानगरपालिकेने सार्व.संस्थाना त्यांच्या मर्यादेत अनुदान अदा करावे, असे नमूद केलेले आहे. कृष्णाई संगीत विद्यालय, श्री क्षेत्र आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे यांनी दिनांक- १३/११/२००९ च्या अर्जान्वये, कृष्णाई संगीत विद्यालय ही सामाजिक संगीत क्षेत्रातील संगीत शिकविणारी प्रख्यात संस्था आहे. या संस्थेमध्ये अनेक विद्यार्थी संगीत शिक्षण घेत आहेत. या संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शास्त्रीय संगीत शिक्षणासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याने, अनुदान र.रु.१,००,०००/- मिळणेकामी विनंती केलेली आहे. सबब, कृष्णाई संगीत विद्यालय, श्री क्षेत्र आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे ही सामाजिक संगीत क्षेत्रातील संगीत शिकविणारी प्रख्यात संस्था असून, या संस्थेमध्ये अनेक विद्यार्थी संगीत शिक्षण घेत आहेत. या संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शास्त्रीय संगीत शिक्षणासाठी मदतीची आवश्यकता असल्याने, या संस्थेची प्रत्यक्ष पाहणी करुन, संस्थेची घटना नियमावली, अटी शर्ती, ऑडिट रिपोर्ट या कागदपत्राची अट शिथिल करुन कृष्णाई संगीत विद्यालय, पुणे यांना अनुदान र.रु.१,००,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. मे.मोकळ फिल्म प्रा. लिमिटेड व कलारंग सांस्कृतिक कला संस्था पिंपरी चिंचवड हे विविध क्षेत्रामध्ये कामगिरी करित असून लघुपट निर्मितीमध्ये उल्लेखनिय कामगिरी श्री.प्रविण मोकळ करित असून राज्यस्तरीय व आंतर राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी झाला असून आता त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावयाचा

असून त्याकरिता त्यांना पुढील येणारे खर्चाकरिता महापालिकेतर्फे रक्कम रुपये १,००,०००/- अनुदान म्हणून पिंपरी चिंचवड परिसरातील कलारंग सांस्कृतिक कला संस्था पिंपरी चिंचवड यांना देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अनुकूल-७५ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ३९ /२०१०
दिनांक :- २९ /०१/२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.